# कलाशिक्षण

## इयत्ता चौथी

विनामूल्य वितरणासाठी



Tele MANAS
National Tele Mental Health Programme
14416

# टेली मानस हेल्पलाईन

**Tele MANAS (Tele Mental Health Assistance and Networking Across States)**

**(१४४१६ / १८००-८९-१४४१६)**

राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रमांतर्गत टेली मानस ही केंद्र पुरस्कृत योजना महाराष्ट्र राज्यात ऑक्टोबर २०२२ पासून राबवण्यात येत आहे. टेली मानस कार्यक्रमांतर्गत हेल्पलाईन क्रमांक १४४१६द्वारे मोफत २४ × ७ एकात्मिक आणि सर्वसमावेशक मानसिक आरोग्य सेवा दिली जाते. यामध्ये विविध मानसिक समस्यांकरिता तज्ज्ञांमार्फत उपचार व समुपदेशन करण्यात येते. टेली मानस हेल्पलाईनवर दूरध्वनी केल्यानंतर आपण दिलेली माहिती ही पूर्णतः गोपनीय राहते, त्यामुळे विद्यार्थ्यांनी निःसंकोचपणे आपल्या समस्या सदर हेल्पलाईन क्रमांकावर दूरध्वनीद्वारे (कॉल करून) सांगाव्यात तसेच मनात असणाऱ्या शंका विचाराव्यात आणि आपल्या समस्येविषयी मदत घ्यावी व दुसऱ्यांनाही मदत घेण्यास सांगावे.

# मनोदर्पण

मनोदर्पण (८४४८४४०६३२) ही मोफत दूरध्वनी सेवा जुलै २०२०पासून शिक्षा मंत्रालय यांच्यामार्फत राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद येथील मनोदर्पण कक्षाद्वारे विद्यार्थ्यांना, पालकांना तसेच शिक्षकांना मानसशास्त्रीय मार्गदर्शन व साहाय्य प्रदान करण्यासाठी सकाळी ८ ते संध्याकाळी ८ या कालावधीत आठवड्यातील सर्व दिवस उपलब्ध करून देण्यात आली आहे. विद्यार्थी, पालक व शिक्षक आवश्यक मार्गदर्शन व समुपदेशन घेण्यासाठी या हेल्पलाईनवर देखील दूरध्वनी करू शकतात.

शासन निर्णय क्रमांक : अभ्यास – २११६/(प्र.क्र.४३/१६) एसडी– ४ दिनांक २५.४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दिनांक ०१.०६.२०२६ रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक सन २०२६–२७ या शैक्षणिक वर्षापासून निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.



# कलाशिक्षण

## इयत्ता चौथी

**समग्र शिक्षा**

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४.

सोबतच्या चौकटीतील Q.R.Code स्मार्टफोनवर द्वारे स्कॅन केल्यास आपणास डिजिटल पाठ्यपुस्तक व पाठ्यपुस्तकातील घटकांसंबंधित दृक, श्राव्य आणि दृकश्राव्य स्वरूपातील अध्ययन – अध्यापन साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती : २०२६

© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४११००४

या पुस्तकाचे सर्व हक्क महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

**'कला शिक्षण' विषय समिती**

श्री. शशिकांत देशमुख, (अध्यक्ष)
श्री. शिवाजी हांडे (सदस्य)
श्री. गोरक्षनाथ आबुज (सदस्य)
श्री. श्रीकांत ढालकर (सदस्य)
श्रीमती पुनम भोपळे (सदस्य)
श्रीमती छाया माळवाळ (सदस्य)
श्रीमती स्नेहा गाडे (सदस्य)
डॉ. सुमेधा ठाकुर (निमंत्रित)
श्री. नंदकिशोर नगरकर (निमंत्रित)
श्रीमती मृगया मोरे (निमंत्रित)
श्री. अमोल जाधव (निमंत्रित)
श्री. नितिन महामुनी (निमंत्रित)
श्रीमती वृषाली लेले (निमंत्रित)
श्रीमती निताली हरगुडे (निमंत्रित)
श्री. ओंकार वैरागकर (निमंत्रित)
श्री. अमोल बोधे (निमंत्रित)
श्रीमती जुई देशिंगकर (निमंत्रित)
श्रीमती रश्मी जोशी (निमंत्रित)
डॉ. गीतांजली बोरूडे (अभ्यासक्रम समन्वयक)
डॉ. अजयकुमार लोळगे (सदस्य सचिव)

**समीक्षक**

डॉ. दयानंद घोटकर (गुणवत्ता परीक्षक)
ॲड. संदेश साखरे (विधीतज्ज्ञ)
प्रा. विलास पंडीत (CWSN तज्ज्ञ)

**संयोजक**

**डॉ. अजयकुमार लोळगे**
विशेषाधिकारी कार्यानुभव (वि. का.)
प्र. विशेषाधिकारी कलाशिक्षण
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

**मुखपृष्ठ व अंतर्गत चित्राकृती :**
श्री. लक्ष्मीकांत काळे, श्रीमती प्राजक्ता केरकर, श्री. मनोहर बावीस्कर, श्रीमती प्राची पोतदार, श्री. सोहम ओतारी, श्री. आदित्य पराडकर

**अक्षरजुळणी :** मुद्रा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे

**कागद :** ७० जी.एस.एम.क्रीमवोव्ह

**मुद्रणादेश :** N/PB/2026-27/Qty.50,000

**मुद्रक :** M/s Imprints, Palghar

**निर्मिती**

**श्रीमती मिताली शितप**
प्र. मुख्य निर्मिती अधिकारी

**श्री. संदीप अजगावकर**
निर्मिती अधिकारी

**प्रकाशक**

**श्री. हेमंत बाबर**
प्र. नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, प्रभादेवी, मुंबई – २५

## भारताचे संविधान

### उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## भारताचे संविधान

### भाग ४ क

# नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.
(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.
(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.
(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.
(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.
(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.
(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.
(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.
(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.
(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.
(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

## राष्ट्रगीत

जनगणमन–अधिनायक जय हे
भारत–भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत–भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

बालमित्रांनो,

इयत्ता चौथीच्या वर्गात तुम्हां सर्वांचे स्वागत. इयत्ता चौथीचे कलाशिक्षणचे हे पाठ्यपुस्तक तुमच्या हाती देताना आम्हांला आनंद होत आहे.

तुमच्या हातात आलेले हे कलाशिक्षणाचे पुस्तक तुम्हांला कला शिकताना आनंद देणारे आणि तुमच्या कल्पनांना बळ देणारे आहे. चित्र काढणे, रंग भरणे, गाणे म्हणणे, अभिनय करणे, नृत्य करणे किंवा वेगवेगळ्या हालचालींमधून भावना व्यक्त करणे, या सगळ्या गोष्टी म्हणजेच कला. कला आपल्या विचारांना आणि भावनांना सुंदर पद्धतीने व्यक्त करायला मदत करते.

या पुस्तकात दृश्यकला, रंगमंच, संगीत, नृत्य व हालचाल या वेगवेगळ्या चार कला प्रकारांचा समावेश आहे. दृश्यकलेत तुम्ही रेखाटन, स्मरणचित्र, वस्तूचित्र, नक्षीकाम, शिल्पकला, अक्षरलेखन आणि कलासंस्कृती यांसारख्या गोष्टी शिकाल. रंगमंचातून अभिनयाचा अनुभव घ्याल. संगीतामध्ये गायन व वादन शिकाल, तर नृत्य व हालचालींमधून शरीराची लय आणि ताल तुम्हांला अनुभवता येईल.

या पुस्तकातील उपक्रम तुम्हांला स्वतः विचार करायला, कल्पना करायला आणि नवीन गोष्टी तयार करायला मदत करतील. काही उपक्रम तुम्ही एकटे कराल, तर काही उपक्रम मित्रांसोबत समूहाने कराल. त्यामुळे शिकणे अधिक मजेदार आणि आनंददायी होईल.

या पुस्तकात चित्र काढताना आणि कलाकृती निर्माण करताना वेगवेगळी साधने, साहित्य आणि तंत्रे वापरण्याची संधी दिली आहे. शक्य तितके पर्यावरणपूरक साहित्य वापरण्याचा प्रयत्न करा. आपल्या परिसरातील उपलब्ध असलेल्या वस्तूंमधूनही सुंदर कला निर्मिती करता येते, हे तुम्हांला अनुभवता येईल.

तुमच्या परिसरातील स्थानिक कला, कलाकार आणि संस्कृती यांची ओळख करून देण्यासाठी काही उपक्रम आणि क्षेत्रभेटी सुचवल्या आहेत. त्यामुळे आपल्या परंपरेतील सुंदर कलावैभव तुम्हांला जवळून पाहता येईल.

प्रत्येक विद्यार्थी वेगळा असतो आणि प्रत्येकामध्ये काही ना काही खास गुण असतात. त्यामुळे या पुस्तकातील उपक्रम करताना स्वतःच्या कल्पना मोकळेपणाने व्यक्त करा. चूक होण्याची भीती बाळगू नका. प्रयत्न करत राहा आणि कला शिकण्याचा आनंद घ्या.

हे पुस्तक तुमच्यातील कलाकार जागा करेल आणि शिकण्याचा प्रवास अधिक सुंदर बनवेल, अशी आम्हांला खात्री आहे.

चला, आनंदाने कला शिकू या आणि आपल्या कल्पनांना रंग देऊ या.

**(अनुराधा ओक)**
**संचालक**
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.४

पुणे.

**दिनांक : १९ एप्रिल २०२६**
**भारतीय सौर : वैशाख शु. २, १९४८**
**अक्षय्यतृतीया**

# शिक्षकांसाठी

इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांसाठी तयार केलेले हे कलाशिक्षण पाठ्यपुस्तक आपल्या हातात देताना आनंद होत आहे. नवीन शैक्षणिक धोरण, २०२० च्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार कलाशिक्षण हा विषय विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी खूप महत्त्वाचा मानला आहे. विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला वाव देणे, कल्पनाशक्ती वाढवणे, अभिव्यक्तीसाठी प्रोत्साहन देणे आणि शिकण्याची प्रक्रिया आनंदमय करणे, हा कलाशिक्षण पाठ्यक्रमाचा हेतू आहे.

या पाठ्यपुस्तकात दृश्यकला, रंगमंच, संगीत, नृत्य व हालचाल या चार कला प्रकारांचा समावेश आहे. प्रत्येक कलाप्रकारातून विद्यार्थ्यांना निरीक्षण करण्यासाठी, सादरीकरण करण्यासाठी, नवनिर्मिती करण्यासाठी आणि स्वतःच्या कल्पना व्यक्त करण्यासाठी वाव मिळणार आहे.

कृतियुक्त उपक्रम, गटकार्य, चर्चा आणि भूमिकाभिनय या कलाध्यापन पद्धतीचा वापर करून अध्ययनाचा अनुभव दिला पाहिजे. प्रत्येक उपक्रमातून आनंदी शिक्षण प्रक्रियेवर भर दिला पाहिजे. दृश्यकला, रंगमंच, संगीत, नृत्य आणि हालचालींच्या माध्यमातून विद्यार्थी आपले विचार, भावना आणि कल्पना सहज व्यक्त करू शकतील.

या पुस्तकात चार विभागांत दृश्यकला, नाट्य, संगीत, नृत्य अशी विभागणी केली असली तरी आपल्या वार्षिक नियोजनात या चारही विभागांतील घटक समप्रमाणात घेण्यात यावेत, जेणेकरून विद्यार्थ्यांना वर्षभर चारही कला प्रकारांचा आस्वाद मिळेल व अनुभव घेता येईल.

या पाठ्यपुस्तकात उपक्रमांची रचना करताना, सर्व प्रकारच्या विद्यार्थ्यांचा सर्वसमावेशक विचार केला आहे. प्रत्येक विद्यार्थ्याला आपल्या क्षमतेनुसार सहभाग घेता यावा, त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन मिळावे यासाठी शिक्षकांनी संवेदनशील दृष्टी ठेवावी.

## शिक्षकांसाठी सूचना:

### दृश्यकला

- विविध प्रकारच्या रेषा व आकार तसेच सुंदर अक्षर लेखनासाठी विविध अक्षर अवयवांचा सराव करून घ्यावा.
- नैसर्गिक घटक व मानवनिर्मित घटक यातील फरक समजून सांगावा व त्यांची उदाहरणे द्यावीत.
- स्मरणचित्र काढण्याचे टप्पे समजून सांगावे. मात्र चित्र काढताना इतरांच्या चित्रांची कॉपी करणार नाही याची काळजी घ्यावी. तसेच प्रसंगाचे वर्णन करून स्मरणचित्र काढण्यासाठी प्रेरित करावे.
- स्मरणचित्र व कल्पना चित्र यांचे नमुने दाखवून दोघातील फरक स्पष्ट करावा. त्यांच्या कल्पनेला वाव मिळेल अशा कथा/गोष्टी सांगून वातावरण निर्मिती करावी.
- विविध प्रकारचे चित्र नमुने, छायाचित्रे, शिल्पकलेचे नमुने यांचा संग्रह करावा व या संग्रहाचा शैक्षणिक साहित्य म्हणून वापर करावा.
- सर्वच विद्यार्थी दृश्यकलेतील चित्र आवडीने काढतील असे नाही तर त्याबद्दलची आवड निर्माण करण्यासाठी प्रेरक असे अध्ययन अनुभव प्रात्यक्षिकाच्या माध्यमातून देणे आवश्यक ठरते. या दृष्टीने एखादा विद्यार्थी नव्याने काही दृश्यकला सादर करण्याचा प्रयत्न करत असेल तर त्याला प्रोत्साहित करावे, योग्य असे मार्गदर्शन करावे.
- स्थानिक कला प्रकार व कलाकार यांचा परिचय करून द्यावा. शक्य असेल तर स्थानिक कलाकारांच्या कार्यशाळेस क्षेत्रभेट आयोजित करावी.

### रंगमंच

- वर्गात आनंददायी वातावरण निर्मिती करून सहज व नैसर्गिक कृती, हालचाली व मूक अभिनय करून घ्यावा. छोटे छोटे गट करून प्रसंग सादर करण्यास सांगावे.
- प्राणी, पक्षी, निसर्गातील विविध घटकांची भूमिका देऊन अभिनय करून घ्यावा.

- स्वतःचे संवाद व हालचाली सादर करण्याची संधी द्यावी. चित्र दाखवून प्रश्न विचारावेत. जसे की, ‘ तुम्हांला या चित्रातून काय दिसते ?’
- प्रत्येकाला भूमिका देऊन सादरीकरणात सहभागी करून घ्यावे. दैनंदिन अनुभवांना साजेसे प्रसंग निवडावेत.
- सादरीकरणात हालचाली करताना सुरक्षितता लक्षात घ्यावी. उपलब्ध साहित्याचा वापर विविध प्रकारे करण्याची सवय लावावी.
- एका गटाच्या सादरीकरणाचे निरीक्षण करण्याची इतर गटांतील विद्यार्थ्यांना संधी द्यावी. निरीक्षणात्मक अभिप्राय देण्यास प्रेरित करावे. वर्गनाट्यगृहाची संकल्पना राबवावी.

**संगीत**

- वर्गात आनंददायी व उत्साही वातावरण निर्माण करून विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग घ्यावा.
- गाणी शिकवताना स्वतः गाणे ऐकून सादरीकरण करावे. गाणी शिकवताना गाण्याचे छोटे छोटे भाग करून शिकवावे.
- ताल, लय आणि सूर यांची ओळख सोप्या उदाहरणांद्वारे करून द्यावी. तालासाठी टाळ्यांचा वापर करून गाणे अधिक रंजक बनवावे. एकल व युगल गायनासाठी प्रोत्साहन द्यावे.
- लोकसंगीत जसे वासुदेव गीत, पोवाडा, भारूड, भजन, जात्यावरची गाणी यांची ओळख करून द्यावी व प्रात्यक्षिकांसह सराव करून घ्यावा.
- उपलब्ध वाद्यांचा (ढोल, टाळ, झांज, हार्मोनियम, तबला इत्यादी) वापर करून तालाची जाणीव करून द्यावी. छोट्या-छोट्या गटांमध्ये विभागून गाणी सादर करून घ्यावीत.
- प्रत्येक विद्यार्थ्याला गाण्यात अथवा वादनात सहभागाची संधी देऊन त्यांचा आत्मविश्वास वाढवावा.
- उपलब्ध साहित्य किंवा व्हिडिओच्या माध्यमातून स्वर व अलंकारांचा तालासुरात सराव करून घ्यावा.
- क्यू.आर.कोडचा वापर करून गाणी ऐकवावेत व शिकवावीत. गट व वैयक्तिक सादरीकरणाद्वारे मूल्यमापन करावे.

**नृत्य व हालचाल**

- वर्गात आनंदी व उत्साही वातावरण निर्माण करून प्रत्येक विद्यार्थ्याला नृत्यात सहभागी होण्यास प्रेरित करावे.
- सहज, नैसर्गिक हालचालींमधून नृत्याची ओळख करून द्यावी.
- दैनंदिन हालचाल (उदा. चालणे, उडी मारणे, फिरणे) नृत्यात रूपांतरित करण्यास सांगावे.
- ताल, लय व गती यांची जाणीव खेळकर पद्धतीने करून द्यावी.
- चेहऱ्यावरील विविध भाव (आनंद, दुःख, आश्चर्य) हावभाव व्यक्त करण्यास मार्गदर्शन करावे.
- छोट्या-छोट्या गटांमध्ये साधे नृत्यप्रयोग सादर करण्यास प्रोत्साहन द्यावे. प्रत्येक विद्यार्थ्याला नृत्यात सहभागी होण्याची संधी द्यावी.
- नृत्य करताना शारीरिक सुरक्षितता, योग्य अंतर राखणे व योग्य पोशाख परिधान करण्याबाबत सूचना द्याव्यात.
- उपलब्ध साधनसामग्री (संगीत, जागा) यांचा योग्य वापर करून विविध प्रकारचे नृत्य अनुभव देण्याचा प्रयत्न करावा.
- नृत्याच्या शेवटी त्यांनी काय अनुभवले/ शिकले यांवर थोडक्यात चर्चा घ्यावी. सर्जनशीलतेला व आत्मविश्वासाला प्रोत्साहन देणारा सकारात्मक अभिप्राय द्यावा.

सर्व प्रकारच्या विद्यार्थ्यांचा सर्वसमावेशक विचार करून पाठ्यपुस्तकाची रचना केली आहे. प्रत्येक विद्यार्थ्याला आपल्या क्षमतेनुसार सहभाग घेता यावा, त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन मिळावे यासाठी या पाठ्यपुस्तकातील उपक्रमांची रचना करण्यात आली आहे. विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या गरजा लक्षात घेऊन त्याबाबत संवेदनशील दृष्टी ठेवावी.

प्रत्येक कला गटासाठी दिलेला अभ्यासक्रम, ध्येये व क्षमता तसेच अध्ययन निष्पत्तीचा आधार घेऊन शिक्षक अधिक प्रभावी अध्यापन करतील अशी अपेक्षा आहे. यातून कलाविषयाकडे समग्र दृष्टीने पाहणारा कौशल्यपूर्ण विद्यार्थी तयार व्हावा व त्याला आनंददायी जीवन जगता यावे हाच उद्देश आहे. त्यासाठी आपण सर्व जण मिळून प्रयत्न करू या.

**कलाशिक्षण विषय समिती**
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे

| इयत्ता : ४ थी | |
|---|---|
| **विषय : दृश्यकला** | |
| **अभ्यासक्रम ध्येय : CG – 1 :** कलेच्या माध्यमातून मानवी भावनांचे अन्वेषण, चित्रण आणि अभिव्यक्ती करण्याचा आत्मविश्वास विकसित करणे. | |
| **क्षमता : C – 1.1 :** दैनंदिन जीवनातील भावभावना आणि कल्पनाचित्रण करणाऱ्या विविध प्रतिमा उत्साहाने तयार करतो. | |
| **क्रमांक** | **अध्ययन निष्पत्ती** |
| 04AE01 | परिसरातील छोट्या घटकांवर आधारित स्मरणाने चित्रण करतो. |
| 04AE02 | विविध काल्पनिक गोष्टींमधील प्रसंग स्वतःच्या कल्पकतेने चित्रात मांडतो. |
| 04AE03 | नैसर्गिक घटकांच्या विविध आकारांच्या नक्षीकामात कल्पकतेने वापर करतो. |
| 04AE04 | परिसरातील छोट्या घटकांचे स्मरणचित्र करतो/काढतो. |
| **क्षमता : C – 1.2 :** दृश्यकलांमध्ये परस्पर समन्वय साधून काम करताना विविध कल्पना आणि प्रतिसादांची चर्चा करतो. | |
| 04AE05 | अंक/अक्षरांची वळणे अभ्यासतो व गिरवतो. |
| 04AE06 | अंक/अक्षरांची प्रमाणबद्धता समजून लेखन करतो. |
| 04AE07 | आविष्काराच्या विविध माध्यमांचा वापर करून अंक/अक्षरांची रचना करतो. |
| **अभ्यासक्रम ध्येय : CG – 2 :** कलेच्या सरावासाठी आपली कल्पनाशक्ती आणि सर्जनशीलतेचा मुक्त वापर करणे. | |
| **क्षमता : C – 2.1 :** दैनंदिन निरीक्षणे, वैयक्तिक अनुभव आणि भावनांचे चित्रण करताना दृश्य घटकांच्या विविध संयोजनांचा (रेषा, आकार, रंग, अवकाश, पोत) सर्जनशीलतेने वापर करतो. | |
| 04AE08 | विविध प्रकारांनुसार रेषांचे रेखांकन करतो. |
| 04AE09 | यांत्रिक साधनांशिवाय विविध आकारांचे सोप्या पद्धतीने रेखाटन करतो. |
| 04AE10 | दैनंदिन वापरातील परिचित घटक वस्तूंचे सोप्या पद्धतीने चित्रण करतो. |
| **क्षमता : C – 2.2 :** वर्गात सामायिक केलेल्या कलाकृतीचे दृश्य घटक, संकल्पना आणि विरोधाभास स्पष्ट करतो. | |
| 04AE11 | भौमितिक आकारांचा, परिसरातील इतर वस्तूंच्या आकारांशी संबंध जोडून साम्यभेद स्पष्ट करतो. |
| 04AE12 | निरीक्षणातून अनुभवलेल्या घटक वस्तूंचे वर्गीकरण करून चित्रण करतो. |
| 04AE13 | चित्रात स्वतःच्या कल्पना मुक्तपणे मांडून त्यांचे वर्णन करतो. |
| **अभ्यासक्रम ध्येय : CG – 3 :** कलेतील मूलभूत प्रक्रिया, साहित्य आणि तंत्राचे आविष्कार करणे. | |
| **क्षमता : C – 3.1 :** दृश्यकलांमध्ये काम करताना वापरले जाणारे साहित्य, साधने आणि तंत्राची निवड करतो. | |
| **क्रमांक** | **अध्ययन निष्पत्ती** |
| 04AE14 | मुद्रा घेण्यासाठी विविध रंगमाध्यमांचा वापर करतो. |
| 04AE15 | विविध प्रकारचे पोत (Texture) निर्मिती करतो. |
| **क्षमता : C – 3.2 :** वैयक्तिक आणि सामूहिक दृश्य कलाकृती तयार करताना नियोजन, अंमलबजावणी आणि सादरीकरणाच्या टप्प्यांचे पालन करतो. | |
| 04AE16 | उपलब्ध साधन/साहित्यांचा कल्पकतेने वापर करून सजावट करतो. |
| 04AE17 | परिसरातील उपलब्ध पर्यावरणपूरक साहित्यापासून त्रिमितीय रचना करतो. |
| 04AE18 | मातकामातून त्रिमित आकारांची प्रतीकात्मक चिन्हे साकारतो. |
| **अभ्यासक्रम ध्येय : CG – 4 :** सभोवतालच्या नैसर्गिक सौंदर्याचा शोध घेणे व विविध स्थानिक कलाप्रकार आणि सांस्कृतिक चालीरितींची आवड निर्माण करणे. | |
| **क्षमता : C – 4.1 :** निसर्गातील दृश्य घटक ओळखतो आणि त्यांच्या कलात्मक गुणांचे वर्णन करतो. | |
| 04AE19 | निसर्गातील विविध घटकांच्या कलात्मक वैशिष्ट्यांचे वर्णन करतो. |
| **क्षमता : C – 4.2 :** स्थानिक कलाप्रकार आणि संस्कृतीबद्दल उत्सुकता दर्शवतो. | |
| 04AE20 | स्थानिक कलाप्रकारांपैकी आवडीच्या कलाप्रकारातील घटकांची चित्रे, फोटो, कात्रणे जमा करून प्रकल्प तयार करतो. |
| 04AE21 | विविध कलाप्रकारांचा स्थानिक कलासंस्कृतीबरोबर संबंध जोडून माहिती विशद करतो. |

| विषय : रंगमंच | |
|---|---|
| **अभ्यासक्रम ध्येय : CG – 1 :** कलेच्या माध्यमातून मानवी भावनांचे आत्मपरीक्षण, सादरीकरण आणि अभिव्यक्ती करण्याचा आत्मविश्वास अनुभवातून विकसित करणे. | |
| **क्षमता : C – 1.1 :** नाट्यकलेतील प्रसंग आणि अनुभव तसेच विविध घटकांचे, पात्रांचे उत्साहाने सादरीकरण करतो. | |
| 04AE22 | परिसरातील दैनंदिन प्रसंगाचे निरीक्षण करून सादरीकरण करतो. |
| **क्षमता : C – 1.2 :** नाट्यकलेतील परस्पर समवाय साधून काम करताना स्वतःच्या विचारांची आणि प्रतिसादांची चर्चा करतो. | |
| 04AE23 | परिसरातील परिचित व्यावसायिक व्यक्तींच्या आवाजाचे निरीक्षण करून हुबेहूब नक्कल करतो. |
| 04AE24 | साहाय्यकांच्या केलेल्या सादरीकरणाचे निरीक्षण करून प्रतिक्रिया देण्यास सांगावे. |
| **अभ्यासक्रम ध्येय : CG – 2 :** कलेच्या सरावासाठी आपली कल्पनाशक्ती आणि सर्जनशीलतेचा मुक्त वापर करणे. | |
| **क्षमता : C – 2.1 :** दैनंदिन निरीक्षणे, वैयक्तिक अनुभव आणि भावनांचे चित्रण करताना दृश्य घटकांच्या विविध संयोजनांचा सर्जनशीलतेने वापर करतो. | |
| 04AE25 | नाट्य सादरीकरणाची आवश्यक साहित्याची जमवाजमव करतो. |
| 04AE26 | नाट्य सादरीकरणाच्या पूर्वतयारीसाठी साहित्य जमवून योग्य जागी मांडणी करतो. |
| 04AE27 | परिसरात उपलब्ध असणाऱ्या, ध्वनी निर्माण करणाऱ्या वस्तू जमवून नाट्य पार्श्वसंगीत निर्माण करतो. |
| **क्षमता : C – 2.1 :** विविध पात्रे, भूमिका, प्रसंग, अवकाश आणि रंगभूमीवरील चीजवस्तू एकत्र करून रोजच्या घडामोडींवर आधारीत नाट्य तयार करून वर्गात सादर करतो. | |
| 04AE28 | सादरीकरणानंतर चर्चेत आलेल्या सूचनांचा विचार करून पुन्हा सादरीकरण करतो. |
| 04AE29 | इतरांनी केलेल्या सादरीकरणावर वैयक्तिक अथवा गटात प्रतिक्रिया देतो. |
| **अभ्यासक्रम ध्येय : CG – 3 :** कलेतील मूलभूत प्रक्रिया, साहित्ये व तंत्रांचा आविष्कार करणे. | |
| **क्षमता : C – 3.1 :** नाट्य कलेमध्ये काम करताना वापरल्या जाणारी साहित्य, साधने व तंत्राची निवड करतो. | |
| 04AE30 | विविध सादरीकरणामध्ये आवश्यक साहित्यांची माहिती घेऊन पर्यायी साहित्याची निर्मिती करतो. |
| 04AE31 | सादरीकरणासाठी पात्रानुसार वेशभूषेसाठी आवश्यक साहित्याची निवड करतो व सादरीकरण करतो. |
| 04AE32 | नाटकातील भूमिकेनुसार पात्रांसाठी कागदी मुखवटे तयार करतो. |
| **क्षमता : C – 3.2 :** वैयक्तिक आणि सामूहिक नाटक सादर करताना नियोजन, अंमलबजावणी आणि सादरीकरणाच्या टप्प्यांचे पालन करतो. | |
| 04AE33 | वैयक्तिक अथवा गटातील सादरीकरणाचा सहकाऱ्यांबरोबर सराव करतो. |
| 04AE34 | तांत्रिक बाबींच्या साहाय्याने सादरीकरणाचा सराव करतो. |
| **अभ्यासक्रम ध्येय : CG – 4 :** सभोवतालच्या नैसर्गिक सौंदर्याचा शोध घेणे व विविध स्थानिक कलाप्रकार व सांस्कृतिक चालीरीतींची आवड निर्माण करणे. | |
| **क्षमता : C – 4.1 :** निसर्गातील नाट्य आणि हालचालींचे घटक ओळखतो व त्यांच्या कलात्मक गुणांचे वर्णन करतो. | |
| 04AE35 | निसर्गातील विविध प्रहर (वेळ) दाखवताना सादरीकरणात नैसर्गिक प्रकाशाचा वापर करतो. |
| 04AE36 | पाठ्यपुस्तकातील पाठाचे किंवा कवितेचे सादरीकरण करताना नैसर्गिक साहित्याचा वापर करतो. |
| 04AE37 | मानवी शरीर कृतींमधून सादरीकरणात नैसर्गिक साधनांच्या घटकांचे आकार तयार करतो. |
| **क्षमता : C – 4.2 :** स्थानिक कलाकार आणि संस्कृतीबद्दल उत्सुकता दर्शवतो. | |
| 04AE38 | परिसरात साजऱ्या होणाऱ्या सण-समारंभांचे निरीक्षण करून आनंद घेतो. |
| 04AE39 | स्थानिक लोक कलाकार व त्यांच्या कलांविषयी माहिती जाणून कलेस योग्य प्रतिसाद देतो. |

| विषय : संगीत | |
|---|---|
| **अभ्यासक्रम ध्येय : CG – 1 :** कलेच्या माध्यमातून मानवी भावनांचे अन्वेषण, सादरीकरण आणि अभिव्यक्ती करण्याचा आत्मविश्वास अनुभवातून विकसित करणे. | |
| **क्षमता : C – 1.1 :** परिचित असलेल्या संगीतकलेचा सराव, सादरीकरण उत्साहाने करतो. | |
| 04AE40 | परिचित संगीत लक्षपूर्वक ऐकून सादरीकरण करतो. |
| 04AE41 | गीतांचा सराव करताना हातवारे, टाळ्यांचा तसेच चुटक्यांचा वापर. |
| **क्षमता : C – 1.2 :** संगीत कलेमध्ये सामूहिक काम करताना स्वतःच्या विचारांची व प्रतिसादांची चर्चा करतो. | |
| 04AE42 | देशभक्तीपर गीतांमधून राष्ट्रीय एकात्मतेचे महत्त्व ओळखतो. |
| **अभ्यासक्रम ध्येय : CG – 2 :** कलेच्या सरावासाठी आपली कल्पनाशक्ती आणि सर्जनशीलतेचा मुक्त वापर करणे. | |
| **क्षमता : C – 2.1 :** विविध प्रकारच्या गायन, वादन (एकल, युगल आणि समूह) संगीत संयोजनातील गाणी आणि ताल यांचा सराव आणि सादरीकरण यांचे संयोजन करतो. | |
| 04AE43 | गायन वादनाची लय व ठेका समजून घेऊन एकल गीत सादर करणे. |
| 04AE44 | गायन व वादनातील युगल, व समूह संगीत प्रकारांचा सराव करून सादरीकरण करतो. |
| **क्षमता : C – 2.2 :** गीत आणि अभिव्यक्ती यांद्वारे वर्गात सादर केलेल्या विविध संगीत शैलीमध्ये संगीत कलेच्या घटकांची तुलना व विरोधाभास (लय, ताल, सूर, भाव) दाखवतो. | |
| 04AE45 | भिन्न गीतप्रकार ऐकून त्यातील फरक ओळखतो. |
| 04AE46 | शास्त्रीय संगातातील स्वर व अलंकार यांची थोडक्यात माहिती सांगतो. |
| **अभ्यासक्रम ध्येय : CG – 3 :** कलेतील मूलभूत प्रक्रिया साहित्य आणि तंत्राचे अविष्कार करणे. | |
| **क्षमता : C – 3.1 :** संगीत कलेचे सादरीकरण करताना ध्वनी, वाद्ये, संयोजनासह सादरीकरण करताना त्यांची निवड करतो. | |
| 04AE47 | परिसरातील संगीतोपयोगी ध्वनी ऐकून त्याचे अनुकरण करतो. |
| 04AE48 | उपलब्ध साहित्याचा उपयोग करून वादनाचे सादरीकरण करतो. |
| **क्षमता : C – 3.2 :** सादरीकरण आणि सरावात सहभागी होण्यासाठीचे संगीत निवडताना विविध कल्पना सुचवतो. | |
| 04AE49 | अभंग व पोवाडा सादरीकरणात उपयुक्त वाद्यांची निवड करून वापरतो. |
| **अभ्यासक्रम ध्येय : CG – 4 :** प्रादेशिक कला व सांस्कृतिक परंपरांमधील सौंदर्याविषयक संवेदनशीलतेच्या विस्ताराशी स्वतःला परिचित करणे. | |
| **क्षमता : C – 4.1 :** निसर्गातील संगीत घटक ओळखतो व त्यांच्या कलात्मक गुणांचे वर्णन करतो. | |
| 04AE50 | निसर्गातील विविध ध्वनींचे निरीक्षण करून अनुकरण करतो. |
| 04AE51 | स्थानिक सण उत्सवाशी संबंधित संगीताची माहिती सांगतो. |
| **क्षमता : C – 4.2 :** स्थानिक कलाप्रकार आणि संस्कृती बद्दल उत्सुकता दाखवतो. | |
| 04AE52 | स्थानिक पारंपरिक कलाप्रकारांची माहिती सांगतो. |
| 04AE53 | स्थानिक पारंपरिक संगीतामधून लोकजीवन व संस्कृतीची ओळख स्पष्ट करतो. |

| विषय : नृत्य व हालचाली | |
|---|---|
| **अभ्यासक्रम ध्येय : CG – 1 :** कलेच्या माध्यमातून मानवी भावनांचे अन्वेषण, सादरीकरण आणि अभिव्यक्ती करण्याचा आत्मविश्वास अनुभवातून विकसित करणे. | |
| **क्षमता : C – 1.1 :** परिचित असलेल्या नृत्य हालचींचा सराव आणि प्रदर्शन उत्साहाने सादर करतो. | |
| 04AE54 | परिचित नृत्यातील शारीरिक हालचालींचे क्रमशः आणि लयबद्ध सादरीकरण करतो. |
| **क्षमता : C – 1.2 :** नृत्य आणि हालचालींमध्ये सामूहिक सादरीकरण करताना कल्पना आणि प्रतिसादांची चर्चा करतो. | |
| 04AE55 | नृत्य आणि हालचालींच्या सामूहिक सादरीकरणात सहभाग साधतो. |
| **अभ्यासक्रम ध्येय : CG – 2 :** कलेच्या सरावासाठी आपली कल्पनाशक्ती आणि सर्जनशीलतेचा मुक्त वापर करणे. | |
| **क्षमता : C – 2.1 :** दैनंदिन कृती आणि वैयक्तिक अनुभवांवर आधारीत नृत्य आणि हालचालींचा क्रम तयार करून सादर करतो. | |
| 04AE56 | दैनंदिन जीवनातील केल्या जाणाऱ्या शारीरिक हालचाली नृत्यातून लयबद्ध पद्धतीने मंचावर सादर करतो. |
| **क्षमता : C – 2.2 :** वर्गात परिचय करून दिलेल्या विविध नृत्य व हालचाल शैलीमधील अभिव्यक्ती ताल, मुद्रा आणि विषय यातील साम्यभेदावर आधारीत तुलना करतो. | |
| 04AE57 | नृत्यात्मक हालचालींद्वारे दोन ताल समजून घेऊन त्यांची तुलना करतो. |
| **अभ्यासक्रम ध्येय : CG – 3 :** कलेतील मूलभूत प्रक्रिया, साहित्य आणि तंत्रांचा आविष्कार करणे. | |
| **क्षमता : C – 3.1 :** नृत्यात वापरलेली वाद्य, पोषाख, कृतिक्रम, नृत्यातील इतर व्यवस्था यांची निवड करतो. | |
| 04AE58 | नृत्य बसवण्यासाठी गीत व वाद्यांची निवड करतो. |
| 04AE59 | नृत्यात वापरण्यासाठी विषयानुसार विविध शारीरिक हालचाली निवडतो. |
| **क्षमता : C – 3.2 :** नृत्य आणि हालचालींचे क्रम निवडताना सादरीकरण आणि सरावात सहभागी होताना कल्पनांचे योगदान देतो. | |
| 04AE60 | स्वतःच्या कल्पनेप्रमाणे पडद्यावर आधारीत नृत्य आणि हालचालींद्वारे सादरीकरण करतो. |
| **अभ्यासक्रम ध्येय : CG – 4 :** प्रादेशिक कला व सांस्कृतिक परंपरांमधील सौंदर्याविषयक संवेदनशीलतेच्या विस्ताराशी स्वतःला परिचित करणे. | |
| **क्षमता : C – 4.1 :** निसर्गातील संगीत घटक ओळखतो त्यांच्या कलात्मक गुणांचे वर्णन करतो. | |
| 04AE61 | नृत्यातील हालचाली व निसर्गातील हालचाली यांची तुलना करून त्याचे कलात्मक वर्णन करतो. |
| **क्षमता : C – 4.2 :** स्थानिक कलाप्रकार आणि संस्कृतीबद्दल उत्सुकता दर्शवतो. | |
| 04AE62 | संस्कृतीचे महत्त्व सांगणारे स्थानिक कलाप्रकार उत्साहाने सादर करतो. |

# राज्यगीत

जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा ।।धृ।।

भिती न आम्हा तुझी मुळी ही गडगडणाऱ्या नभा
अस्मानाच्या सुलतानीला जबाब देती जिभा
सह्याद्रीचा सिंह गर्जतो शिव शंभू राजा
दरी दरीतून नाद गुंजला महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा ।।१।।

काळ्या छातीवरी कोरली, अभिमानाची लेणी
पोलादी मनगटे खेळती, खेळ जीवघेणी
दारिद्र्याच्या उन्हात शिजला
निढळाच्या घामाने भिजला
देश गौरवासाठी झिजला
दिल्लीचे ही तख्त राखितो, महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा ।।२।।

# अनुक्रमणिका

## दृश्यकला


| घटक | पृष्ठ |
|---|---|
| १. नक्षीची गंमत | ०१ |
| २. अक्षरांच्या दुनियेत | १० |
| ३. वस्तूंच्या दुनियेत | १४ |
| ४. माझे चित्र व माझी कल्पना | १७ |
| ५. त्रिमितीय कलाकृती | २१ |


## नाट्य


| घटक | पृष्ठ |
|---|---|
| ६. चला अभिनय करू या | २६ |
| ७. यारी करू या नाट्याची | ३१ |
| ८. चला रंगमंचावर | ३८ |


## संगीत


| घटक | पृष्ठ |
|---|---|
| ९. सारे मिळून गाऊ या! | ४५ |
| १०. एकल, युगल व समूहगीत | ५१ |
| ११. गीत परंपरेचे | ५७ |
| १२. स्वर वेल | ६४ |
| १३. चला ताल धरू या | ६७ |


## नृत्य


| घटक | पृष्ठ |
|---|---|
| १४. नाचू आनंदे | ७३ |
| १५. नृत्यमय जीवन | ७८ |
| १६. नृत्याचे सोबती | ८३ |
| १७. पारंपरिक नृत्य | ८७ |
| १८. कला संस्कृती | ९१ |

# दृश्यकला



विनामूल्य वितरणासाठी

# १ . नक्षीची गंमत...

रेखांकन म्हणजे रेषांच्या विविध रचना करून केलेले रेखाटन . चित्रकलेत रेखांकनाला अतिशय महत्व आहे. रेषा वापरून आपण विविध आकार, चित्रे आणि वस्तू काढू शकतो. रेखांकनामुळे चित्र रेखाटनाचा आत्मविश्वास वाढतो.

नक्षीकाम तयार करताना रेषांचा उपयोग खूप महत्त्वाचा आहे. वेगवेगळ्या रेषा वापरून सुंदर नक्षी तयार करता येते. फुले, पाने, भौमितिक व अलंकारिक आकारांत आकर्षक नक्षीकाम तयार होते. रेखांकनाचा सराव केल्याने अधिक सुंदर आणि आकर्षक नक्षीकाम तयार करता येते. रेखांकन करता येणे हे नक्षीकाम करण्यासाठी मूलभूत साधन आहे.

नक्षीकामात वेगवेगळ्या रेषा, आकार, रंग, पोत आणि ठशांचा वापर करून आकर्षक व सुंदर चित्र तयार करू शकतो.

निसर्गातील विविध घटकांचा वापर करूनही सुंदर कलाकृती तयार करता येते. त्यामुळे आपली कल्पकता, सौंदर्यदृष्टी वाढीस लागते.

## रेषांसोबत खेळू.

**रेषांचे प्रकार व त्यांचे नमुने यांची योग्य जोडी लावा.**

| अ गट<br>रेषांचे प्रकार | ब गट<br>रेषांचे नमुने | |
|---|---|---|
| १. नागमोडी रेषा– | अ) | \\\\\\\\\\\\\\\\\\\\\\ |
| २. उभ्या रेषा – | ब) | - - - - - - - - - - - - - - - - - - - - - |
| ३. आडवी रेषा– | क) |  |
| ४. तिरप्या रेषा– | ड) | ||||||||||||||||||||||||||||||||||||||||||| |
| ५. तुटक रेषा– | इ) | ______________________ |

- विद्यार्थ्यांना सोप्या रेषांपासून सुरुवात करून हळूहळू आकार आणि नमुने तयार करायला मार्गदर्शन करावे.
- पेन्सिल/पेन यांव्यतिरिक्त अन्य कोणत्याही साधनांचा वापर करून रेषा प्रकारांचा सराव करून घ्यावा.

CG –2
C– 2.1
LO–04AE08

• चित्रातील विविध घटक/वस्तू  पाहून त्यातील रेषांचे प्रकार शोधा व लिहा.

१) चकली



........................................................................

२) पाण्याची लाट



........................................................................

३) उंच इमारत



........................................................................

४) मुंग्यांची ओळ



........................................................................

• रेषांचा वापर करून चित्रकृती पूर्ण करूया.

सोबत दिलेल्या ‘अ’ चित्रांचे निरीक्षण करा. विविध रेषांचा वापर करून ‘ब’ चित्रकृती  पूर्ण करा.



अ



ब

• नक्षीकाम करताना विद्यार्थ्यांच्या स्व कल्पनांना जागृत करावे. संदर्भासाठी  संग्रहित नमुना चित्रे, चित्रफिती दाखवाव्यात.

CG –2
C– 2.1
LO–04AE08

- सोबतच्या मोठ्या चौकोनातील प्रत्येक छोट्या चौकोनात विविध रेषा प्रकारांचा वापर करून चित्र पूर्ण करा.



- आकृतिबंध पूर्ण करा.

अंक व अक्षर यांपासून रेषेच्या डाव्या बाजूची रचना दिलेली आहे. त्याप्रमाणे उजव्या बाजूला प्रतिबिंबीत रचना काढा.





खालील आकृतिबंध पूर्ण करून त्यात आवडीचे रंग भरा.



- रेषांचा सराव करून नक्षीकाम करण्यास प्रवृत्त करावे.

CG –1/2
C– 1.2/2.1
LO–04AE07/08

## नैसर्गिक आकारांचा आकृतिबंध तयार करू या.

**पान, फूल किंवा निरनिराळे नैसर्गिक आकार वापरून आकृतिबंध पूर्ण करा. तुमच्या आवडीनुसार गडद किंवा उजळ रंगात रंगवा.**



**लक्षात ठेवा :**

एक किंवा दोन आकार पुन्हा-पुन्हा काढून त्यात रंग भरल्यास सुंदर नक्षी तयार होते .

## आकृतिबंधातून नक्षी तयार करू या.

**१. सोबत काही आकृतिबंध दाखवले आहेत. त्यापैकी योग्य आकृतिबंध वापरून खालील चित्र पूर्ण करा.**





**२. चित्रकला वहीत साडीच्या किनारीसाठी नक्षी तयार करून त्यात आकर्षक रंग भरा.**

- कृती करताना विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे.

CG -1
C- 1.1
LO-04AE03

## पोत आणि नक्षीकाम

- **वस्तूंना प्रत्यक्ष स्पर्श करून त्या कशा आहेत त्याचे वर्णन करा.**
  उदा. काच, कापूस, कापड, दगड आणि पान या व यांसारख्या वस्तूंना स्पर्श करून त्यांचे वर्णन करा. बालमित्रांनो, तुम्ही स्पर्शातून अनुभव घेतला व त्यातून तुम्ही काय शिकलात तर या जाणवणाऱ्या स्पर्शाला चित्रांच्या भाषेत '**पोत**' म्हणतात.
- ज्या पृष्ठभागाला स्पर्श केल्यावर आपल्याला खरबरीत, गुळगुळीत, टोकदार, मऊ असण्याची जाणीव होते त्याला '**स्पर्शजन्य पोत**' म्हटले जाते..
- स्पर्शाशिवाय केवळ डोळ्यांनी पृष्ठभागाचा खरखरीत, गुळगुळीत, टोकदार असा आभास होतो त्याला '**दृश्यजन्य पोत**' म्हटले जाते. काही वेळा आपण उमटवलेले ठसे देखील नक्षीकामात पोत म्हणून वापरू शकतो. चला तर मग आपण ठशांची गंमत अनुभवू या.

### ठसे ओळखा

खाली दिलेल्या चित्रांचे ठसे कशाचे आहेत ते निरीक्षण करून ओळखा व चित्राखाली लिहा.






________  ________  ________  ________

- अशा विविध ठसे कामांतूनही नक्षीकाम करता येते. विविध वस्तूंचे ठसे कागदावर घेता येतात. उदा. गोणपाट, बटाटा, हातांच्या बोटांचे ठसे इत्यादी.
- आणखी कोणत्या वस्तूंचे ठसे कागदावर घेता येतील याची यादी करा .

**लक्षात ठेवा :**

ठसे कामासाठी जलरंगांचा वापर करावा लागेल. ठसे उमटवताना रंग खूप पातळ होणार नाहीत याची काळजी घ्यावी.

- विविध पोतांचा वापर करून नक्षीकाम करून घ्यावे.

CG -3
C- 3.1
LO-04AE14
LO-04AE15

## ठशांपासून नक्षी :

**तुमच्या वहीत आवडीचा कोणताही एक मोठा आकार काढा. त्यात उपलब्ध साहित्याचा वापर करून विविध प्रकारचे ठसे घेऊन छान नक्षी तयार करा.**

## पोत आणि कोलाज

**विविध प्रकारचे पोत घेऊन त्यापासून कोलाजचित्र तयार करू या.**

घरातील अनेक वस्तूंचा वापर आपण पोत मिळवण्यासाठी करू शकतो. उदा. घरातील खिडक्यांच्या काचा, नाणी, झाडाची साल इत्यादी.

विविध वस्तूंवर कागद ठेवून त्यावर रंगीत पेन्सिल घासून तुम्ही त्याचे पोत घ्या. त्यांचे विविध आकार कापून कागदावर चिकटवा आणि कल्पकतेने यांचा वापर नक्षी चित्रात करा. आता सोबतचे नमुना चित्र बघा. केवळ पोत निर्मितीमुळे चित्राची गंमत खूप वाढेल.





- पोतनिर्मिती करण्यासाठी गटात चर्चा घडवून आणावी व विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला वाव द्यावा.

CG -3
C-3.1
LO-04AE14
LO-04AE15

### कृती करून पाहू या !

मोठे खोड असलेल्या झाडाचे चित्र काढा. झाडाची पाने, शेंगांची टरफले, रांगोळी, माती, वाळू, काड्या यांपैकी कोणत्या वस्तू वापरल्या तर तुम्हांला झाडाच्या खोडाचा स्पर्श जाणवेल ते ओळखा. ही कृती तुमच्या चित्रकला वहीत करा.

### नैसर्गिक घटकांचा वापर करून नक्षी तयार करू या.

नैसर्गिक घटकांचा वापर करून मुक्तपणे नक्षी तयार करूया. उदा. शंख, शिंपले, पाने- फुले, दगड इत्यादी.











तुमच्या परिसरातील नैसर्गिक घटकांचा वापर करून तुम्हीदेखील एक नक्षी तयार करा व आपल्या शिक्षकांना दाखवा.

### शुभेच्छा कार्ड तयार करू या.

बाजारातील शुभेच्छा कार्ड विकत घेण्यापेक्षा स्वतः तयार केलेले कार्ड आपल्या मित्रमैत्रिणींना दिले तर त्यांना अधिक आनंद होतो.

- निसर्गातून मिळणाऱ्या घटकांपासून सुशोभनास प्रवृत्त करावे.
- चुका दाखवण्याऐवजी नवीन प्रयोग करण्यास प्रोत्साहित करा.

CG -3
C- 3.2
LO-04AE16
LO-04AE17

निसर्गातील घटक वस्तूंचा वापर करून आपण, मित्र/मैत्रिणींस शुभेच्छा देण्यासाठी नक्षी (भेटकार्ड) तयार करू या.

यासाठी झाडाची पाने, काड्या, बोटांचे ठसे, कागदाचे तुकडे इत्यादींचा वापर करता येईल.

एक जाड कागद घ्या. त्यावर झाडाची पाने, काड्या इत्यादी घटक नमुना चित्रामध्ये दाखवल्याप्रमाणे कागदावर चिकटवून सुंदर शुभेच्छा कार्ड तयार करा.

**लक्षात ठेवा :** कृती करताना झाडाची गळालेली वेगवेगळ्या रंगांची पाने वापरावीत.









- विद्यार्थ्यांना उपलब्ध साधन साहित्यांचा वापर करण्याची सवय लावावी.
- विशिष्ट साहित्य पाहिजे असा आग्रह करू नये .

CG -1/3
C- 1.1/3.2
LO-04AE03
LO-04AE16

### चला रंगांशी खेळू या!

आज आपण रंगांची एक जादू पाहणार आहोत. ही कृती करून तुम्ही अतिशय सुंदर आणि आकर्षक नक्षी तयार करू शकता.

- सर्वात आधी एक कोरा कागद घ्या. आणि तो मधोमध दुमडून त्याची घडी घाला. आता कागद पुन्हा उघडा. कागदाच्या एका बाजूला तुमच्या आवडीच्या रंगाचे लहान-मोठे थेंब टाका. त्यानंतर कागद पुन्हा अलगद दुमडा आणि त्यावरून हलक्या हाताने दाब द्या. आता सावकाशपणे कागद उघडून पहा. काय नवल! दोन्ही बाजूंना अगदी सारखी आणि सुंदर नक्षी तयार झालेली दिसेल.
- अशाच प्रकारे तुम्ही वेगवेगळे रंग वापरून नवनवीन प्रयोग करून पहा. यातून तुम्हांला रंगांचा एक वेगळाच पोत मिळेल. या सुंदर नक्षीचा उपयोग करून तुमच्या मित्र-मैत्रिणींसाठी छान अशी भेटकार्डे तयार करू शकता.



## माझी कृती

१) कागदी पिशवी तयार करून त्यावर तुम्ही शिकलेली तंत्र, ठसे वापरून सजावट करा.
२) विविध नैसर्गिक घटकांचा तसेच मानव निर्मित घटकांचा वापर करून त्यापासून सुंदर बुकमार्क, भेटकार्ड तयार करा.
३) पानाफुलांचा वापर करून सजावटीसाठी रांगोळी तयार करा.

- कागदावर विविध रंगांचे ठिपके टाकून वरील कृती प्रमाणे सुंदर कलाकृती बनवून घ्यावी.

CG -3
C-3.1
LO-04AE14
LO-04AE15

# २ . अक्षरांच्या दुनियेत...

बालमित्रांनो, चित्राप्रमाणे आपले अक्षर देखील सुंदर असणे खूप महत्त्वाचे आहे. अक्षर लेखन म्हणजे स्वच्छ, स्पष्ट, सुवाच्य लिहिण्याची कला. पण त्यासाठी सराव खूप महत्त्वाचा आहे.

मुक्तहस्त रेषा काढल्यामुळे तुमचे हातावर नियंत्रण वाढते आणि अक्षर लिहिण्यास मदत होते.

**'रेषा व अक्षरांचा सराव करू या'**







दिलेल्या विविध रेषा दुरेघी वहीत काढण्याचा सराव करा.

चार रेघी वहीत इंग्रजी मुळाक्षरे व अंक लिहीण्याचा सराव करा.

या पूर्वीच्या इयत्तेत आपण मराठी अक्षरांचे अवयव, वळणे इत्यादींचा सराव केला आहे. या वर्षी जोडाक्षरयुक्त शब्दांचा सराव करूया. सोबत दिलेली अक्षर पहा आणि त्यांचा सराव तुमच्या वहीत करा.




- विविध प्रकारच्या अक्षर लेखनाचा सराव करून घ्यावा.
- विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अक्षर वळणे व अक्षर लेखनाचे नमुने दाखवावेत.

CG -1
C- 1.2
LO-04AE05

## विविध माध्यमांतून अक्षर लेखन करू या.

विविध माध्यमांचा वापर करून अक्षरांचा सराव करू या .

१. बोटांनी हवेत अक्षरे काढून ती तुमच्या मित्र-मैत्रिणींना ओळखण्यास सांगा.

२. वाळू किंवा मातीवर अक्षरे काढा.

३. पेन, पेन्सिलच्या सहाय्याने अक्षर लेखनाचा सराव करा.

४. स्केच पेन, रंगीत खडूच्या साहाय्याने अक्षरलेखन करून पाहा.

पेन्सिल लेखन → SAVE WATER

पेन लेखन → SAVE WATER

स्केचपेन लेखन → SAVE WATER

रंगीत खडू लेखन → SAVE WATER

## सुविचार पट्ट्या तयार करू या

आपण वर्गामध्ये अनेकदा मोठे तक्ते (चार्टस्) किंवा सुविचार पट्ट्या लावलेल्या पाहतो. त्यावरील अक्षरे मोठी आणि सुवाच्य असणे आवश्यक असते. हे साहित्य आकर्षक पद्धतीने कसे तयार करावे याची पुढील कृती आपण समजून घेऊ आणि याचा सराव करू या.

१. एक तैलखडू घेऊन त्याला तिरपा कट द्या.

२. खडू हातात पकडून चित्रात दाखवल्याप्रमाणे लेखनाचा सराव करा.

३. सराव झाल्यावर वर्गासाठी सुविचार पट्टी किंवा चार्टसाठी लेखन करा.











- विविध माध्यमांचा वापर करून अक्षर लेखनाचा सराव करून घ्यावा.

CG -1
C- 1.2
LO-04AE05
LO-04AE06

म

## अक्षर काढा व सजवा!

तुमच्या नावाचे आद्याक्षर काढून ते आवडत्या माध्यमात सजवू या. त्यासाठी दोरा, पाने- फुले, बिया, रांगोळी, मणी, दोरा, सुतळी किंवा तुमच्या आवडीच्या साहित्याचा वापर करा.







## मुक्तहस्त रेखाटन

- **अंक–अक्षरांची रचना करू या.**
- **रेषेच्या डाव्या बाजूस दिलेला आकार पाहून उजव्या बाजूस रेखाटन करा व रंगवा.**



- अक्षरांचे आकार, उंची आणि अंतर यांचे प्रात्यक्षिक दाखववावे.

CG -1
C- 1.2
LO-04AE07

## अक्षर व अंकापासून चित्र काढूया!

**अक्षरे आणि अंकांचा वापर करून चित्र रेखाटन करू या.**

१. **खालील वाक्य प्रमाणबद्ध लिहिण्याचा सराव करू या.**

- माझे अक्षर हीच माझी ओळख
- निसर्ग आपला गुरू आहे.
- भारत माझा देश आहे .
- INDIA IS MY COUNTRY.
- SAVE TREES, SAVE EARTH.

## माझी कृती

१) पाठ्यपुस्तकातील कोणताही उतारा/ कविता पेन, पेन्सिल, स्केचपेन यांपैकी कोणत्याही साधनाने लिहा.
२) भेटकार्ड तयार करून त्यात साजेशी वाक्ये लिहा.
३) एखादी घोष पट्टी तयार करा.
४) फलकावर सुंदर मोठ्या अक्षरात सुविचार लिहा.

- सुंदर आणि स्पष्ट अक्षरलेखनासाठी पेन्सिल योग्य पद्धतीने पकडण्याची सवय लावावी.
- भरपूर सराव करून घ्यावा. फळ्यावर लिहिण्यासाठी प्रोत्साहन द्यावे .
- विविध शैलींतून अक्षरलेखन करून घेण्याचा प्रयत्न करण्यास सांगावे.

CG -1
C- 1.2
LO-04AE05
LO-04AE06

# ३ . वस्तूंच्या दुनियेत

वस्तूचित्र म्हणजे आपल्या परिसरात दिसणाऱ्या वस्तूंचे निरीक्षण करून त्यांचे हुबेहूब चित्रण करणे. फुले, फळे, भांडी, खेळणी किंवा शालेय वस्तूंची चित्रे यात काढता येतात. वस्तूचित्र काढताना वस्तूचा आकार, प्रमाण, रंग, छाया, प्रकाश आणि पोत यांकडे लक्ष द्यावे लागते. वस्तूचे चित्र काढताना रंगांचा वापर करून चित्र अधिक सुंदर करता येते.

वस्तूचित्राच्या सरावामुळे निरीक्षणशक्ती आणि आत्मविश्वास वाढतो.

## आकारांपासून वस्तूचे चित्र काढू या

रेषापासून आकार तयार करण्यास आपण शिकलो. आता मूळ आकारांपासून दैनंदिन वापरातील वस्तूंची चित्रे तयार करता येतात. हे पुढील कृतीतून पाहू या.

खाली दिलेल्या एक किंवा अनेक आकारांचा वापर करून जास्तीत जास्त वस्तूंची चित्रे तयार करा.





- विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष वस्तू दाखवावी, वस्तूंचे निरीक्षण करून त्यांचे आकार ओळखण्यास सांगावे.
- सोप्या आकारातील वस्तूंच्या रेखाटनापासून सुरुवात करावी.

CG -2
C- 2.1
LO-04AE09

## सभोवतालच्या वस्तूंचे रेखाटन करू या



- तुमच्या दप्तरातील कोणत्याही दोन वस्तूंचे रेखाटन करून रंगवा .

दप्तरातील वस्तूंची यादी तयार करा व त्यातील कोणत्याही दोन किवा तीन वस्तूंचे प्रत्यक्ष रेखाटन खाली दिलेल्या जागेत करा. त्या वस्तू कोणत्या मूळ आकाराशी मिळत्याजुळत्या आहेत ते सांगा.

वस्तूंचे रेखाटन करताना कोणत्याही यांत्रिक साधनांचा वापर करू नका.

## वस्तूंच्या आकारातील फरक ओळखू या.

- चित्रातील वस्तूंची नावे ओळखा.
- सर्वांत मोठी वस्तू कोणती.
- चित्रातील सारखेपणा दिसणाऱ्या वस्तूंची नावे सांगा.
- कोणत्या वस्तू गोलाकार दिसतात.
- बादली व खोके यात काय फरक आहे.
- सफरचंद व चेंडू यात कोणते साम्य दिसते.
- वरील चित्र तुमच्या वहीत काढा.



- दैनंदिन वापरातील वस्तूंचे निरीक्षण करून चित्रे काढण्यास सांगावीत.
- वर्गात प्रत्यक्ष वस्तू (फळे, भांडी, खेळणी) ठेवून निरीक्षणातून चित्र काढायला सांगावे.

CG –2
C– 2.1/2.2
LO–04AE10
LO–04AE11
LO–04AE12

## वस्तूंचे रेखाटन करू या

आपल्याला निसर्गाकडून काही घटक मिळतात त्याला 'निसर्गनिर्मित घटक', तर काही वस्तू मानव स्वतः तयार करतो त्यांना 'मानवनिर्मित वस्तू' असे म्हणतात. हे आपण मागील इयत्तेत शिकलो आहोत.

- आवडीनुसार निसर्गनिर्मित व मानवनिर्मित वस्तूंचे प्रत्यक्ष निरीक्षण करून वहीत रेखाटन करा. (उदा: बादली, मग, ग्लास, चेंडू, झाडाचे पान, फूल, नारळ, केळी इत्यादी.)



## माझी कृती

१) घरातील कोणत्याही दोन वस्तूंची रचना करून त्यांचे चित्रण करून रंगवा.
२) परिसरातील कोणत्याही पाच वस्तूंची स्वतंत्रपणे रेखाटने करा.

- आधी पेन्सिलने हलके रेखाटन करून नंतर त्यात रंगभरण असा क्रम ठेवावा.
- विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या कोनातून वस्तू पाहायला सांगावे.
- चित्रातील बारकावे लक्षात घेण्याची सवय लावावी.

CG -2
C- 2.1/2.2
LO-04AE10
LO-04AE12

# ४ . माझे चित्र व माझी कल्पना

**रेखाटन:** रेखाटन म्हणजे रेषांच्या साहाय्याने चित्राची सुरुवात करणे. आपण पाहिलेली घटना, प्रसंग आठवून त्यांची चित्रे काढण्यासाठी रेखाटन आपल्याला मदत करते. रेखाटनामुळे चित्रातील घटकांची योग्य मांडणी, आकार आणि प्रमाण नीट ठेवता येते. त्यामुळे चित्राची रूपरेषा स्पष्ट आणि समजण्यास सोपी होते. प्रथम हलक्या रेषांनी चित्र काढल्यास चुका दुरुस्त करणेही सोपे जाते.

स्मरणचित्र व कल्पनाचित्र काढण्यासाठी रेखाटनाचा सराव आवश्यक असतो.

**स्मरणचित्र :** आपण जेव्हा पाहिलेल्या, ऐकलेल्या, प्रसंगाचे, अनुभवांचे, घटनांचे चित्र आठवणीच्या आधारे काढतो त्या चित्रास 'स्मरणचित्र' असे म्हणता येईल .

- उदाहरणार्थ पुस्तकातील गोष्टींवर आधारित प्रसंगचित्र काढणे.

## स्मरणाने चित्र काढू या

- शाळेत येताना कोणते झाड दिसले ? निसर्गात कोणकोणते घटक दिसून आले ? परिसरातील झाडे कशी होती ? झाडावर काय काय दिसले ? तसेच परिसरातील माणसांच्या हालचाली देखील आपण पाहिल्या आहेत. यातील प्रमुख घटकांच्या रेखाटनाचा सराव आपण पेन्सिलच्या साहाय्याने आपल्या वहीत करू या.







- प्रत्येक विद्यार्थ्याच्या चित्राचे कौतुक करून त्याचा आत्मविश्वास वाढवा.

CG –1
C– 1.1
LO–04AE01

## स्मरणाने चित्र काढा

| गट 'अ' | गट 'ब' | गट 'क' |
|---|---|---|
| **नैसर्गिक घटक**<br>पाने, फुले, पक्षी, झाडे, नदी, डोंगर, पाऊस | **पारंपारिक घटक**<br>सण, उत्सव, पारंपरिक खेळ, रांगोळी, तोरण | **आधुनिक घटक**<br>संगणक, टी व्ही., मोबाईल, पार्क, मेट्रो |

वरील कोणत्याही एका गटातील काही घटक निवडा त्यांच्या आधारे आठवून वहीत स्मरण चित्र काढा.

- निवडलेल्या घटकांचे पेन्सिलने पुसट रेखाटन करा.
- चित्र रचना कागदाला शोभेल अशी काढावी. निवडलेल्या घटकातील जास्तीत जास्त बारकावे रेखाटण्याचा प्रयत्न करा व चित्र रंगवा.

## पाहिलेल्या दृश्याच्या आधारे चित्र काढू या

- परिसरातील पाहिलेले दृश्य आठवा. त्यातील बारकावे आठवून रेखाटन करा.

घर किंवा शाळेच्या परिसरात तुम्ही तुमच्या मित्रांसोबत विविध खेळ खेळत आहात. असे प्रसंग आठवून चित्र रेखाटन करा व रंगवा.

## प्रसंगाचे वर्णनानुसार चित्र काढू या

- अजय बागेत गेला. त्याला उंच डेरेदार झाडांवर एक पक्षी फांदीवर बसून फळ खाताना दिसला. आजूबाजूला रंगीत फुले फुललेली होती. त्यावर रंगीबेरंगी फुलपाखरे आनंदाने उडत होती.

या प्रसंगानुसार वहीमध्ये चित्र काढून रंगवा.

- विद्यार्थ्यांच्या अनुभवावर आधारित प्रसंग चित्र रेखाटण्यास प्रोत्साहित करावे.
- योग्य किंवा अयोग्य असे बंधन न ठेवता मुक्तपणे चित्र काढू द्यावे.

CG –1
C– 1.1
LO–04AE01
LO–04AE04

## कल्पनाचित्र

डोळ्यांना जे दिसते, त्या पलीकडे जाऊन मनाला जे सुचते, ते दृश्य स्वरूपात मांडणे म्हणजे '**कल्पनाचित्र**' होय. कल्पना चित्रामुळे नावीन्यपूर्ण कल्पकता आणि विचार करण्याची क्षमता वाढते. तसेच चित्रकलेबद्दल आवड आणि आत्मविश्वासही वाढतो. त्यामुळे कल्पनाचित्र ही चित्रकलेतील एक महत्त्वाची आणि आनंददायी प्रक्रिया आहे.

कल्पनाचित्र काढताना नावीन्यपूर्ण कल्पना करावी. जसे की, उडणारी सायकल किंवा चंद्रावरची शाळा. आपल्याला आवडलेली कल्पना रेषा व रंगांच्या साहाय्याने कल्पनाचित्राच्या रुपात कागदावर काढता येईल.

## कल्पनेतून चित्र काढू या

उदा : आकाशातील घर, स्वप्नातील गाव, मला पंख असते तर..., रंगीत ढग, इत्यादी.





- **कल्पना करा व चित्र काढा.**

**१. तुमच्या कल्पनेने अस्तित्वात नसलेल्या नवीन प्राण्याचे चित्र वहीत काढा.**

**२. चंद्रावरील सहल अशी कल्पना करून कागदावर चित्र काढा.**

- वर्गात विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला वाव मिळेल अशी वातावरण निर्मिती तयार करावी.

CG- 1
C- 1.1
LO-04AE02
LO-04AE13

## माझी कृती

१. बाजारात पाहिलेल्या एखाद्या प्रसंगाचे चित्र काढून रंगवा.
२. 'पतंग उडवणारी मुले' या विषयावर स्मरणचित्र काढा.
३. 'रोबोटसोबत खेळताना' अशी कल्पना करून चित्रकलेच्या वहीत चित्र काढा.
४. 'चॉकलेटचे घर' अशी कल्पना करून चित्रकलेच्या वहीत चित्र काढा.
५. हवेत उडणाऱ्या गाड्यांची कल्पना करून चित्रकलेच्या वहीत चित्र काढा.

- कोणतीही कल्पना चुकीची नसते हे विद्यार्थ्यांना सांगावे.
- कल्पना चित्र काढताना चुका सांगू नका. कल्पनेला प्रोत्साहन द्यावे. चित्रांचे कौतुक करावे.

CG- 1/2
C- 1.1/2.2
LO-04AE01
LO-04AE02
LO-04AE04
LO-04AE13

# ५ . त्रिमितीय कलाकृती...

शिल्पकला म्हणजे माती, कागद, लाकूड किंवा इतर माध्यमांचा वापर करून त्रिमित कलाकृती साकारण्याची कला होय. शिल्पकलेतून निर्माण झालेल्या वस्तूंचा आनंद सर्व बाजूंनी घेता येतो. अशा वस्तूंना लांबी, उंची, रुंदी आणि जाडी असते म्हणूनच त्यांना 'त्रिमितीय वस्तू' किंवा 'शिल्प' असे म्हणतात.

शिल्पकलेत मातीच्या माध्यमातून आपण प्राणी, फळे, फुले किंवा विविध वस्तू तयार करू शकतो. त्रिमितीमुळे वस्तूंचे आकार आणि रचना समजण्यास मदत होते. त्यामुळे शिल्पकला ही आपल्यासाठी आनंददायी आणि उपयुक्त कला आहे.

**उपलब्ध मातीपासून (क्ले) प्रतीकात्मक चिन्ह तयार करू या.**

१. सर्वप्रथम मऊ आणि स्वच्छ माती घ्यावी.
२. माती हाताने मळून तिला मऊ करावे.
३. एखादे सोपे प्रतीकात्मक चिन्ह निवडावे. उदा. – सूर्य, झाड, पुस्तक, मासा.
४. मातीचा छोटा गोळा करून त्याला हाताने किंवा साधनाने आकार द्यावा.
५. निवडलेल्या चिन्हाप्रमाणे मातीला दाबून किंवा वळवून योग्य आकार तयार करावा.
६. तयार केलेल्या चिन्हावर बोटांनी किंवा काडीने लहान तपशील दाखवावेत.
७. तयार झालेले चिन्ह अलगदपणे सपाट पृष्ठभागावर सुकण्यासाठी ठेवावे.
८. मातीचे चिन्ह वाळल्यानंतर त्यावर रंग लावून ते अधिक आकर्षक करावे.

या कृतीमुळे कल्पकता, कल्पनाशक्ती आणि हस्तकौशल्य विकसित होते.






- विद्यार्थ्यांच्या हस्तकौशल्याला प्रोत्साहन द्यावे.
- सोप्या आकारापासून सुरुवात करून वस्तू तयार करायला शिकवावे.

CG –3
C– 3.2
LO–04AE17
LO–04AE18

## निसर्गातील घटकांचे कलात्मक वैशिष्ट्ये –

चित्र किंवा शिल्प तयार करण्यापूर्वी आपण परिसरातील निसर्गाचे व भौतिक घटकांचे बारकाईने निरीक्षण करायला हवे. विविध नैसर्गिक घटकांची कलात्मक वैशिष्टये निरीक्षणातून लक्षात घेणे आवश्यक असते. उदा. पाण्याच्या लाटा– लयदार, वृक्ष – डेरेदार, अशोकाचे झाड– शंकूच्या आकाराचे खालून वर निमूळते, सूर्य–उत्सर्जन, प्रखरता इ. याप्रमाणे निसर्गातील इतर घटकांच्या वैशिष्ट्यांवर चर्चा करा.

## उपलब्ध साधनांतून प्रतिकृती तयार करू या.

एक लहान गाव, बाग, घर इत्यादींपैकी कोणतीही एक प्रतिकृती तयार करूया. (उदा: झाडांची पाने, फांद्या, घरांसाठी रिकामे (बॉक्स) खोकी, रस्ता किंवा सजावटीसाठी दगड, वाळू यांचा वापर करता येईल )









- विद्यार्थ्यांना हाताने काम करण्याची सवय लावावी.
- सुरक्षिततेची काळजी घेऊन साधनांचा वापर समजावून सांगावा.
- निसर्गातील घटकांचे निरीक्षण करून पाहिलेल्या नैसर्गिक घटकांच्या कलात्मक वैशिष्टयांवर चर्चा करण्याची संधी द्यावी.

CG –3
C– 3.2
LO–04AE17
LO–04AE18
LO–04AE19

## त्रिमितीय कलाकृतींच्या जगात

आपल्या परिसरात आजूबाजूला आपण विविध प्रकारच्या त्रिमितीय रचना पहात असतो.

- दैनंदिन वापरातील लहान आकारातील वस्तूंचा वापर करून तयार केलेल्या त्रिमितीय रचना पहा व त्यांची यादी करा.





**तुमच्या परिसरातील किंवा घरात पाहिलेल्या कोणत्याही चार त्रिमितीय रचनांची नावे सांगा व त्या वस्तूंचे वर्णन करा.**

१) ........................................ २) ........................................

३) ........................................ ४) ........................................

## नैसर्गिक साहित्यातून कलाकृती

पर्यावरणपूरक साहित्य म्हणजे निसर्गाला हानी न पोहोचवणारे घटक व वस्तू .

- नैसर्गिक साहित्यांचा वापर करून रचना करू या.

  उदा: पाने, फुले, बिया, झाडाच्या वाळलेल्या फांद्या, रांगोळी, दगड, माती इत्यादी.







वरील प्रमाणे तुमच्या परिसरातील उपलब्ध साधनांचा वापर करून वेगवेगळया कलाकृती तयार करा.

- त्रिमिती आकाराची संकल्पना प्रत्यक्ष वस्तू दाखवून स्पष्ट करावी.
- विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी त्यांनी तयार केलेल्या वस्तूंचे प्रदर्शन भरवावे.

CG -3
C- 3.2
LO-04AE17

## चला त्रिमित अक्षर तयार करू या.

- मातीपासून स्वत:च्या नावाचे पहिले अक्षर तयार करा.








## माझी कृती

१. नैसर्गिक घटकांचा वापर करून रांगोळी काढा.
२.परिसरातील उपलब्ध मातीचा वापर करून आवडीनुसार दागिने तयार करा.
३.परिसरातील पर्यावरणपूरक घटकांचा वापर करून एक आकर्षक त्रिमितीय रचना तयार करा.
४.मातीपासून वाहतुकीच्या नियमांचे चिन्हे तयार करा.
५.मातीपासून एखादा प्राणी किंवा पक्षी तयार करा.

- प्रत्यक्ष संग्रहित वस्तू नमुने दाखवा. विद्यार्थी कल्पनांना वाव द्यावा. सोप्या वस्तूंपासून सुरुवात करावी. स्वच्छता व सुरक्षितता यांकडे लक्ष द्यावे.

CG -3
C-3.2
LO-04AE18



# रंगमंच

# ६. चला अभिनय करू या

आपण आपल्या आजूबाजूला असणारे अनेक आवाज ऐकतो. तुम्ही कोणाकोणाचे आवाज ऐकले आहेत? पशुपक्षी, व्यक्तींचे आवाज आपण ऐकले आहेत. त्यातील काही व्यक्तींचे आवाज या ध्वनीफितीतून ऐका. तुम्ही थोडा वेळ डोळे बंद करा बरं.

"कांदे-बटाटे-कोथिंबीर... घ्या ताजी मेथी..ss"

"रद्दी... पेपर... जुना लोखंड घेणार... जुनं भंगार घेणार, आला भंगारवाला..ss"

"टिंग-टिंग-टिंग-टिंग... कुल्फी घ्या कुल्फी..ss थंडगार, मलाई कुल्फी..ss"

"मुलांनो, डोळे उघडा आणि सांगा, तुमच्या परिसरात असे आवाज कधी येतात का? हे आवाज कोणाचे असावेत?"

अगदी बरोबर, जे लोक व्यवसाय करतात त्यांचे हे आवाज आहेत.

### आता थोडा विचार करू या.

१. भाजीवाला कसा आवाज देतो?

२. रद्दीवाला कसा आवाज देतो?

३. कुल्फीवाल्याच्या आवाजासोबत घंटीचा आवाज येतो का?

प्रत्येक व्यावसायिक व्यक्तीचा आवाज आणि बोलण्याची पद्धत वेगवेगळी आहे. त्यांचा आवाज काढण्याची पद्धत पण वेगळी असते. त्यांना आपण त्यांच्या आवाजावरून दुरूनही ओळखतो.

### चला नक्कल करू या!

एखाद्या व्यावसायिक व्यक्तीची नक्कल करताना त्या व्यक्तीचा व्यवसाय, पेहराव आणि आवाज यांचा विचार करावा लागतो. आपल्याला भाजीवालीची नक्कल करताना भाजीवाली डोक्यावर 'टोपली' घेऊन भाजी घ्या. 'भाजी.. ताजी ताजी भाजी..ss' असे ओरडते हे आपल्याला माहीत आहे. मग आपल्याला नक्कल करताना भाजीवाली डोक्यावर टोपली कशी धरते, तशी कृती करून भाजी घ्या. 'भाजी.. ताजी ताजी भाजी..ss' असे आवाज काढावे लागतील.

चला तर मग, आपण आधी भाजीवालीची नक्कल करू या.

छान. सर्वांनी छान नक्कल केलीत.

- विद्यार्थ्यांना हुबेहूब आवाज काढून अभिनय करण्याची संधी द्यावी.
- प्रत्येक विद्यार्थ्याचा सहभाग घेऊन त्यांच्या स्वतःच्या निरीक्षणातून केलेल्या अभिनयाचे कौतुक करावे.
- प्रथम पृष्ठावरील क्यू. आर. कोड स्कॅन करून दृकश्राव्य माध्यमाद्वारे स्पष्टीकरण करावे.

CG – 1
C – 1.2
LO–04AE23

आता तुम्ही खालील व्यावसायिकांची नक्कल करून पहा बरं.








**सोबतच्या चित्रातील व्यक्तींच्या आवाजांची नक्कल करा.**





विविध व्यावसायिक व्यक्तींच्या आवाजाच्या चढ-उताराचा सराव करून वर्गासमोर सादरीकरण करा. सर्वांनी सादरीकरणात आणखी काय केले असते तर सादरीकरण चांगले झाले असते यावर चर्चा करा आणि पुन्हा सादरीकरण करा.

**आवाज कोणाचा?**

**चला खेळू या खेळ!**

एका मुलाने किंवा मुलीने डोळे बंद करून उभे रहा. त्याच्या पाठीमागे दुसऱ्या एका मित्राला किंवा मैत्रिणीला उभे करा. मागे उभा असलेला मित्र किंवा मैत्रीण परिसरातील एखाद्या व्यावसायिकाचा फक्त आवाज काढेल. पुढच्या मित्र किंवा मैत्रिणीने तो आवाज कोणाचा आहे आणि तो आवाज काढणारा त्याचा वर्गमित्र कोण आहे, हे ओळखायचे. आवाज ओळखता न येणाऱ्या मित्रमैत्रिणीला पुन्हा दोन संधी द्या. तरीही ओळखता आले नाही तर त्याने शिक्षकांनी सांगितलेली कोणतीही नक्कल करून दाखवावी.

- मुलांच्या सादरीकरणाचे कौतुक करून त्यांच्यातील आत्मविश्वासाचे कौतुक करावे. त्यांच्या आवाजातील चढ-उतार कसे बदलतात, याकडे लक्ष वेधून घ्यावे.

CG – 1/2
C – 2.1/1.2
LO–04AE24/28

## निरीक्षणाच्या आधारे वर्णन करू

आपण आपल्या घरातील व्यक्तींच्या आवाजावरून किंवा त्याच्या हालचालीवरून ती व्यक्ती रागावलेली आहे की आनंदात आहे हे ओळखू शकतो, हो की नाही? प्राणी किंवा पक्षी आनंदात आहेत की रागावलेले आहेत हे समजण्यासाठी आपण अशा विश्वात जाणार आहोत, जिथे माणसं नाही तर प्राणी बोलतात! प्राणी तर बोलतच नाहीत! अगदी बरोबर. तरीदेखील आपण त्यांच्या हालचाली व आवाजावरून ते चिडलेले आहेत की आनंदात आहे हे समजू शकतो.

**आता खाली दिलेली चित्रे पहा बरं!**



चित्रे पाहून चित्रांतील प्रसंगांवर विचार करा व संवाद न बोलता फक्त हालचाल व हावभावावरून प्रसंग सादर करा. या प्रकारच्या अभिनयाला 'मूक अभिनय' म्हणतात.

### करून पाहूया!

१. मूक अभिनयासाठी दोन ते तीन प्राणी किंवा पक्ष्यांच्या चित्रफिती पाहून त्यांच्या हालचालींचा सराव करा.

२. खालील मुद्द्यांच्या आधारे शाळेच्या तयारीचा प्रसंग मूकअभिनयातून दाखवा.

- दप्तरात वह्या-पुस्तके भरणे. - केस विंचरणे. -जेवणाचा डबा घेणे.- पाण्याची बाटली भरणे. -पायात बूट किंवा चप्पल घालून शाळेत जायला निघणे.

- विविध प्राणी - पक्ष्यांच्या हालचालींची नक्कल करण्यास संधी द्यावी. अशा प्रकारच्या हालचाली मूक अभिनयातून सादर करण्यास सांगावे.
- दमशेरासारखे विविध खेळ, चित्र वाचन किंवा कौटुंबिक प्रसंगातून मूक अभिनय करून घ्यावा.

CG -1
C - 1.1
LO-04AE22

## चला खेळ खेळूया!

### मी तुझा आरसा

दोन दोनच्या जोड्या करा. एक 'अभिनेता' असेल आणि दुसरा 'आरसा'. अभिनेता एखादी कृती करेल. 'आरसा' बनलेल्या मित्राने किंवा मैत्रिणीने हुबेहूब तीच कृती आणि त्या वेळचे चेहऱ्यावरील हावभाव एकाच वेळी करायचे आहेत.

**खालील चित्र पहा. चित्राचे निरीक्षण करून पात्रे निवडा कागदी मुखवट्यांचा वापर करून संवादासह गटात सादरीकरण करा.**



### जंगल मित्रांची सहल

**(पात्रे – झाड, मोर, हत्ती, ससा, वारा, पाऊस, डोंगर, सूर्य)**

**डोंगर :** मी अनेक वर्षांपासून न हलता इथे उभा आहे.

**सूर्य :** मी सूर्य आहे. मी उगवलो की सगळीकडे प्रकाश पसरतो.

**झाड :** मी मोठे झाड आहे. मी सर्वांना सावली देतो.

**हत्ती :** वाटेत आलेले दगड, फांद्या माझ्या सोंडेने बाजूला करून सर्वांना मदत करतो.

**मोर :** मी सुंदर पिसारा फुलवून नाच करतो आणि जंगलाची शोभा वाढवतो.

**ससा :** मी वेगाने धावतो. मला गाजर खायला आवडते!

**वारा :** मी थंड झुळूक आणतो. सगळ्यांना आनंद देतो.

**पाऊस :** मी पाणी देतो. त्यामुळे जंगल हिरवेगार राहते.

**जंगल :** जंगल आपले आहे आणि आपण सर्व एकमेकांचे मित्र आहोत.

- विविध प्रसंगांचे संवाद तयार करून मुखवट्यांसह गटात सादरीकरण करण्याची संधी द्यावी.
- पशुपक्ष्यांच्या अभिनयासाठी वेगवेगळ्या मुखवट्यांची निर्मिती करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन द्यावे.
- पशुपक्ष्यांच्या आवाजांची व हालचालींची हुबेहूब नक्कल करण्यास मार्गदर्शन करावे.

CG –3/4
C – 3.1/4.1
LO–04AE31/32/37

वाढदिवसासाठी मिळणारे कागदी मुखवटे यासाठी वापरता येतील. आवश्यकतेनुसार कागद किंवा कार्डशीट पासून मुखवटे तयार करा.

प्राणी, पक्षी यांवर आधारीत निवडलेल्या गोष्टींचे सादरीकरण मुखवटे वापरून करा.

## माझी कृती

- पाठ्यपुस्तकातील कोणत्याही एका विषयावर संवाद तयार करून पात्रांची निवड करा आणि संवादांचे मुखवट्यांच्या व वेशभूषेच्या आधारे गटात सादरीकरण करा.
- तुमच्या परिसरातील व्यावसायिकांचे निरीक्षण करून अभिनय करा.
- व्यावसायिकांच्या संदर्भातील प्रसंगांची निवड करून मूकाभिनय सादर करा.

# ७. तयारी करू या नाट्याची!

आतापर्यंत तुम्ही बऱ्याचदा सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घेतला असेल, हो की नाही. आपण वर्गात देखील प्राणी, पक्षी, कुटुंबातील व्यक्ती यांच्या आवाजाची व हालचालींची नक्कल व मूकअभिनय यांचे सादरीकरण केले. आता आपण एखाद्या प्रसंगावर सादरीकरण करणार आहोत. तुम्ही तयार आहात का?

## सादरीकरणाचे टप्पे

अरे हो पण त्यापूर्वी प्रसंग सादरीकरणाची तयारी करायला हवी. ज्या प्रमाणे आपण घरी किंवा शाळेत एखादा कार्यक्रम साजरा करणार असतो, त्यावेळी घरातील सगळे एकत्र बसून त्या कार्यक्रमासाठी काय काय साहित्य लागेल? काय काय तयारी करावी लागेल? आणि त्यातील कुणी काय काम करायचे? कार्यक्रमाला कोणते कपडे घालायचे? असे बरेच काही नियोजन करतो आणि त्यानंतर प्रत्यक्ष कार्यक्रमाच्या तयारीला सुरुवात करतो. नियोजनाप्रमाणे सर्व गोष्टी पार पडल्या की तो कार्यक्रम सुद्धा छान साजरा होतो. हा कार्यक्रम अगदी एखादा वाढदिवस असो किंवा लग्न, नियोजन आणि तयारी ही करावीच लागते.




अगदी तसेच आपल्याला नाट्यकरणातून एखादा प्रसंग सादर करायचा असेल, तर त्यासाठी सुरुवातीला आधी प्रसंग निवडावा लागतो. प्रसंगातील विषय विचारात घेऊन पात्र निश्चित करावे लागतात. कोणते पात्र कोण करणार हे सुद्धा ठरवावे लागते. पात्रासाठी अनुरूप वेशभूषा, प्रसंगानुरूप साहित्य गोळा करणे हा सुद्धा तयारीचाच एक भाग आहे.

यासोबतच संवाद पाठ करून त्याचा सराव हा देखील खूप आवश्यक असतो. पुरेशा सरावानंतर आपण प्रत्यक्ष रंगमंच्यावर सादरीकरण प्रभावीपणे करू शकतो.

हे सर्व नियोजन व पूर्व तयारी म्हणजे प्रसंग सादरीकरणाचे टप्पेच आहेत. सोबतच्या आकृतीतून तुम्हांला ते अधिक लक्षात येईल.

चला तर यासाठी आपण एक प्रसंग निवडूया आणि प्रसंग सादरीकरणाचे सर्व टप्पे वापरत सादरीकरण करूया.

- प्रसंग सादरीकरणाचे विविध टप्पे स्पष्ट करावेत.

CG –2/3
C – 2.1/3.1
LO–04AE25/30

आपल्या दैनंदिन जीवनात आपण अनेक लोकांशी संवाद साधतो. बाजारात गेल्यावर भाजी विकणाऱ्या भाजीवालीशी ग्राहकाचा संवाद होतो. या संवादातून आपल्याला वस्तूची किंमत विचारणे, ठरवणे, व्यवहार करणे आणि नम्रपणे बोलणे शिकायला मिळते. आज आपण भाजीवाली आणि ग्राहक यांच्यातील संवाद पाहणार आहोत.

**प्रसंग : भाजी मंडई (भाजीवाली वेगवेगळ्या भाज्या घेऊन बसलेली आहे).**

(पात्रे : – भाजीवाली व ग्राहक)

**ग्राहक :** ओ मावशी, वांगी कशी दिली?

**भाजीवाली :** एकदम ताजी वांगी आहेत बघा! ३० रुपयाला पाव किलो. घ्या की, सकाळीच तोडून आणलीये.

**ग्राहक :** अरे बापरे! काल तर २० रुपयाला होती. आज एकदम इतकी वाढली? जरा कमी करा की हो?

**भाजीवाली :** अहो दादा, पाऊस बघा किती पडतोय. शेतातून वांगी काढायला मिळत नाहीत, म्हणून थोडी महाग झालीय.

**ग्राहक :** ते ठीक आहे, पण मी नेहमी तुमच्याकडूनच नेतो. मला ५० रुपयाला अर्धा किलो द्या आणि सोबत ही १० ची कोथिंबीर पण द्या बरं.

**भाजीवाली :** (हसून) अहो दादा, ६० रुपयाला तर मला पण पडत नाही! बरं, तुमचं आणि माझं मिळून १५ ला एक जुडी कोथिंबीर धरते आणि ५५ ला वांगी लावते. एकूण ७० रुपये द्या.

**ग्राहक :** ठीक आहे. हे घ्या ७० रुपये. बरं, ही भेंडी कशी दिली?

**भाजीवाली :** भेंडी ६० रुपये किलो. भेंडी एकदम कोवळी आहे, नख लावून बघा हवं तर.

**ग्राहक :** अर्धा किलो भेंडी द्या आणि हो, हिरवी मिरची आणि कढीपत्ता टाकायला विसरू नका!

**भाजीवाली :** नक्की, नक्की! तुम्ही मागण्याआधीच मी पिशवीत मिरची व कढीपत्ता टाकला आहे. ही घ्या तुमची भाजी.

**ग्राहक :** धन्यवाद मावशी. येतो मी आता.

**भाजीवाली :** या, पुन्हा नक्की या बरं!

- प्रसंग सादरीकरणासाठी निवडलेल्या प्रसंगाचे वाचन करून घ्यावे.

CG –1
C –1.2
LO–04AE23

## पात्रे व पात्रांची निवड –

आता हा प्रसंग सादर करायचा आहे तर आधी या प्रसंगात किती पात्रे आहेत ते विचारात घ्यावे लागेल. या प्रसंगात भाजी विक्रेती आणि ग्राहक अशी दोन मुख्य पात्रे आहेत. ही पात्रे ठरविताना भाजी विक्रेती ही  एक वृद्ध स्त्री आहे. ग्राहक हे मध्यम वयाचे पुरुष पात्र आहे. हे आपल्याला प्रसंगातील संवादावरून लक्षात येईल. म्हणजेच एक मुलगी व एक मुलगा असे दोन विद्यार्थी या दोन पात्रासाठी निवडावे लागतील. तर मग सांगा बरं, तुमच्यापैकी भाजी विक्रेती मावशी आणि ग्राहक कोण होणार ते ठरवा आणि आपापले संवाद पाठ करा बरं. तोपर्यंत आपण पुढील तयारी करू या.

या पात्रांनी त्यांचे संवाद चांगले पाठांतर करणे अपेक्षित आहे. जेणेकरून अगदी सहजतेने ते संवाद बोलू शकतील.

## वेशभूषा –

आता पात्रे ठरविली पण त्यांचे वय व भूमिका विचारात घ्यायला हवी. भाजी विक्रेती ही वयाने ग्राहकापेक्षा मोठी असलेली महिला असावी हे लक्षात येते. भाजी विक्रेती महिला सहावारी साडी किंवा नऊवारी साडी नेसलेली असावी. कपाळाला मोठे कुंकू, कमरेला पैशाची थैली किंवा बटवा, समोर भाज्यांच्या टोपल्या.

ग्राहक हा एखादा माध्यम वयाचा पुरुष, शर्ट पॅन्ट घातलेला, हातात बाजारासाठी पिशवी असलेला. असे प्रसंगानुरूप कपडे निश्चित करावे लागतील. यालाच नाट्याच्या भाषेत वेशभूषा म्हणतात.

## रंगभूषा –

प्रसंग सादरीकरण अगदी हुबेहूब वाटावे यासाठी वेषभूषेसोबतच रंगभूषा देखील महत्वाची असते. जसे की, निवडलेली भाजी विक्रेती हे पात्र थोडे वयस्कर आहे. म्हणजे थोडे केस पांढरे झालेले इ. आता तुमच्या लक्षात आले असेलच, पात्राचा त्याच्या भूमिकेनुसार मेकअप करणे म्हणजे रंगभूषा होय.

आतापर्यंत आपल्याला पत्रानुसार वेशभूषा म्हणजे कपडे, रंगभूषेसाठी काही साहित्य आवश्यक असणार आहे. चला तर प्रसंग सादरीकरणासाठी साहित्याची निवड करून जमवा जमव करूया.

- प्रसंग सादरीकरणासाठी निवडलेल्या प्रसंगानुसार पात्रांची निवड चर्चा करून घ्यावी.
- प्रसंगानुरूप वेशभूषा व रंगभूषा कशी निवडावी यावर चर्चा घ्यावी.
- प्रसंगानुरूप वेशभूषा व रंगभूषा निवड याची संधी द्यावी.

CG –3
C –3.1/3.2
LO–04AE31/34

## निवड करू साहित्याची

आता या भाजी विक्रेती व ग्राहक या प्रसंगाच्या सादरीकरणासाठी आपल्याला कोणकोणते साहित्य लागेल बरं? अगदी बरोबर.

तराजू, भाज्या, छोट्या टोपल्या, पिशवी, पैसे, बटवा, साडी, इत्यादी. छान यादी तयार केलीत बरं.

चला तर या साहित्याची जमवाजमव करायला सुरुवात करा.

### पुढील साहित्य नाट्यप्रसंगानुसार वापरू.



**वरील साहित्याचे निरीक्षण करून खालील प्रसंगात वर्गीकरण करा व वहीत लिहा.**

| १. हॉस्पिटलमधील प्रसंग | २. स्वयंपाक घरातील प्रसंग | ३. वर्गखोलीतील प्रसंग |
|---|---|---|
| ...................... | ........................... | ........................ |
| ...................... | ........................... | ........................ |
| ...................... | ........................... | ........................ |
| ...................... | ........................... | ........................ |

- प्रसंग सादरीकरणासाठी निवडलेल्या प्रसंगानुसार आवश्यक साहित्याची यादी करण्यास सांगावे.
- साहित्य निवडताना ते नैसर्गिक किंवा पर्यावरणपूरक असावे याविषयी माहिती द्यावी.

CG –2/4
C – 2.1/4.1
LO–04AE25/36

## पर्यायी साहित्याचा वापर

आता पहा, आपण जवळजवळ सगळी तयारी केली पण आपल्याला सादरीकरणासाठी सर्व भाज्या, तराजू, पिशवी, पैसे आणणे शक्य होईल का? नाही ना? मग आपण त्यासाठी पर्याय शोधू या.

आता भाजी विकणाऱ्या मावशीकडे वेगवेगळ्या भाज्या दाखवायच्या असतील तर त्या कशा दाखविता येतील यासाठी विचार करा.

भाज्या म्हणून आपल्या परिसरातील झाडांची रंगीत पाने, फुले, शेंगा, गवत यांचा भाज्या म्हणून वापर करता येईल. सुट्टे पैसे म्हणून चपटे दगड जमवू, नोटांसाठी कागदाचे तुकडे वापरू म्हणजे झाले की नाही साहित्य तयार? आहे की नाही गंमत! आपण भातुकलीच्या खेळात पण असेच साहित्य जमवतो खरं ना!

## साहित्य निर्मिती

अरे बरेच साहित्य परिसरात मिळाले. तर काही पर्यायी साहित्य म्हणून वापरायचे ठरले. पण तराजू म्हणून काय पर्यायी साहित्य वापरावे हे सुचत नाही ना?

चला तर मग आपण एक तराजू तयार करूया.

सोपं आहे. आपण बाजारात तराजू पाहिला आहे. दोन बाजूला दोन पारडे असतात. आणि त्यांना समतोल अशी एक दांडी असते. आता पारड्यासाठी दोन पेपर डिश घ्या. दांडीसाठी एक काठी घ्या. आता चित्रात दाखविल्याप्रमाणे टप्प्याटप्प्याने कृती करत तराजू तयार करा. वजनांसाठी छोटे हलके लहानमोठे दगड वापरा. म्हणजेच जेव्हा प्रसंग सादरीकरण करण्यासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध नसेल, पर्यायी साहित्य देखील उपलब्ध होत नसेल, अशा वेळी काही साहित्य तयार करून वापरता येते.




- प्रसंगानुसार आवश्यक साहित्य उपलब्ध न झाल्यास पर्यायी साहित्याचा विचार करण्यास सांगावे. प्रसंगानुरूप कोणकोणते पर्यायी साहित्य वापरता येईल यावर चर्चा करावी.
- पर्यायी साहित्य निवडताना ते नैसर्गिक किंवा पर्यावरणपूरक असावे याविषयी माहिती द्यावी.

CG -2/3/4
C - 2.1/3.1/4.1
LO-04AE/25/30 /36

## साहित्याची मांडणी करताना

प्रसंग किंवा नाटक सादर करताना त्यासाठी लागणाऱ्या साहित्याची निवड गटात चर्चा करून केली आहे. जे साहित्य मिळाले ते जमवून सरावाला सुरुवात करू या. नाहीतर सादरीकरणाच्या वेळी काहीतरी गंमत व्हायची म्हणून सर्वांनी काय लक्षात ठेवावे व काय टाळावे हे पाहू.

- साहित्य वापरायला सोपे व हलके असावे.
- जे साहित्य आपल्याकडे नाही त्यासाठी असेच दिसणारे साहित्य कागदीपट्ट्या/काड्या अशा साहित्यापासून बनवावे.
- सरावाच्या वेळी हे साहित्य सारखेच वापरावे लागणार आहे. त्यामुळे ते तुटणार नाही याची काळजी घ्यावी.
- धारदार, टोकदार साहित्य वापरताना कापणार नाही, लागणार नाही याची देखील काळजी घेऊ.
- आपल्या कलाकार मित्रमैत्रिणींना रंगमंचावर साहित्य व्यवस्थित नेता यावे यासाठी त्याची मांडणी, सादरीकरण सुरू होण्याआधीच करू.
- रंगमंचाच्या डाव्या व उजव्या बाजूला परंतु प्रेक्षकांना दिसणार नाही अशा ठिकाणी ते मांडावे. साहित्या सोबत सराव करताना शिक्षक व इतर मित्रमैत्रिणी सुचवतील तसा आवश्यक बदल करावा.
- महत्त्वाचे म्हणजे सरावानंतर सर्व साहित्य जमा करून योग्य ठिकाणी ठेवायला विसरू नका.
- गरज नसताना या साहित्यासोबत खेळत बसू नका.

आता तुमच्या लक्षात आले असेलच की, कोणत्याही प्रसंगाचे नाट्यसादरीकरण करायचे असेल तर, प्रसंग निवड, पात्र, संवाद, साहित्य निवड, वेषभूषा, रंगभूषा, आणि सराव करून अंतिम सादरीकरण करावे लागते. चला तर मग आधी वाचलेल्या प्रसंगाची पूर्वतयारी करून सादरीकरण करू या.

वर्गात प्रसंगाचा सराव व सादरीकरण करताना वर्गातील इतर विद्यार्थ्यांनी निरीक्षण करून आवश्यक सुधारणा सूचवा. मिळालेल्या सूचनेनुसार सादरीकरणात आवश्यक बदल करून सादरीकण करा.

- प्रसंगानुसार जमा किंवा तयार केलेल्या साहित्याची मांडणी कशी करावी याबद्दल माहिती द्यावी.
- साहित्याची हाताळणी व त्याची निगा राखण्याचे महत्व पटवून द्यावे.

CG -2/3/4
C -2.1/3.1/3.2/ 4.1
LO-04AE26/28/29 /33/34/36

# माझी कृती

१) तुमच्याकडे 'रायटिंग पॅड' असेलच. याचा वापर नाटकांमध्ये आपण कोणकोणत्या वस्तूंना पर्याय म्हणून करू शकतो हे लिहा.



२) पाठ्यपुस्तकातील कोणताही एक प्रसंग निवडा व त्यावर आधारीत सादरीकरणाच्या टप्प्यानुसार पूर्व तयारी करून गटाने सादरीकरण करा.

- सादरीकरणामध्ये लागणाऱ्या वस्तू उपलब्ध नसतील तर त्यासारख्या दिसणाऱ्या एकाच वस्तूचा विविध प्रकारे वापर कसा करता येईल यावर चर्चा व त्याप्रमाणे वापर करण्यास संधी द्यावी.
- एकाच वस्तूचा विविध प्रकारे वापर करण्यासाठी चर्चा करावी.

CG –2/3
C – 2.1/3.1/3.2
LO – 04 AE 25/26/30/29/31/33/36

# ८. चला रंगमंचावर

**चला, आपण ही गोष्ट वाचू आणि सादर करू.**





भरतपूर नावाचे नगर होते. त्या नगरात विजयसिंह नावाचा राजपुत्र राहत होता. तो खूप धाडसी होता. एक दिवस त्याने एकट्याने जंगलात जाण्याचा विचार केला. पहाटेच्या वेळी कोंबडा आरवला तसा राजकुमार उठला. अंघोळ करून तयार झाला. सोबत तलवार घेतली व निघाला. घोडा घेऊन हळूहळू भरतपूरच्या बाहेर पडला. आता नगर संपले. विजयसिंहाने घोड्याची गती वाढवली. शेते संपली. हळूहळू जंगल सुरू झाले. एका ठिकाणी घोडा झाडाला बांधून विजयसिंह जंगलात पायी निघाला. पालापाचोळ्याचा आवाज येत होता. जसजसा पुढे जाईल तसतसा वाऱ्याचा वेग वाढला. सोसाट्याचा वारा सुटला. झाडाच्या फांद्या हलू लागल्या. वाळलेली झाडे पडू लागली. विजांचा कडकडाट सुरू झाला. अचानक समोर एक अकराळ विकराळ राक्षस उभा राहिला. म्हणाला, ''राजपुत्रा, मी तुला कसलीच इजा करणार नाही. पण तुला सावध करत आहे. हे जादूचे जंगल आहे. त्यात तुझा निभाव लागणार नाही आणि तुझी तलवारसुद्‌धा काही करू शकणार नाही. तो जादूगार येण्याआधी तू लवकर माघारी जा.''

मात्र विजयसिंह घाबरला नाही. तो काही बोलणार इतक्यात राक्षस गायब झाला आणि जोराचा पाऊस सुरू झाला. जंगलातील एक एक झाड आपोआप अदृश्य होऊ लागले. हळूहळू संपूर्ण जंगल नाहीसे होऊन तेथे उजाड माळरान दिसू लागले. विजयसिंह पळतच घोडा बांधलेल्या ठिकाणी आला. विजयसिंहाने घोड्याला टाच मारली आणि भरतपूरकडे निघाला. घोडा जोरात खिंकाळला आणि वेगाने दौडत धावू लागला. राजपुत्र सुखरूप नगरात पोहोचला.

- गटातील विद्यार्थ्यांना आलटून-पालटून गोष्ट सांगण्याची संधी द्यावी. या गोष्टीवर आधारित प्रसंग सादर करण्यास प्रोत्साहित करावे.
- संगीत निर्माण करणारी साधने शोधण्यास मार्गदर्शन करावे .

CG -2
C - 2.2
LO-04AE27

काय मुलांनो, कशी वाटली गोष्ट? त्यातील प्रसंग बारकाईने वाचला ना? आता ही गोष्ट सादर करताना त्यातील प्रसंग अगदी खराखुरा वाटावा यासाठी त्यात आलेले आवाज प्रत्यक्ष काढण्याचा प्रयत्न करू. त्याआधी या गोष्टीत आलेल्या आवाजांची यादी करू.

**गोष्टीत आलेल्या आवाजांची यादी**

.................................. .................................. ..................................

.................................. .................................. ..................................

.................................. .................................. ..................................

.................................. .................................. ..................................

.................................. .................................. ..................................

हे सर्व आवाज काढण्यासाठी कशाकशाचा उपयोग करता येईल काही आवाज आपण तोंडाने काढू शकतो. काही आवाज काढण्यासाठी परिसरातील वस्तूंचा वापर करू शकतो. पहा बरं आपल्याला कोणकोणत्या वस्तूंपासून हे आवाज काढता येतील. त्यांची वहीत यादी करा.

गटातील एक जण ही गोष्ट सर्वांना मोठ्याने सांगेल व गटातील इतर मुले-मुली परिसरातील वस्तूंच्या सहाय्याने आवाज काढून ती गोष्ट अजून छान वाटावी यासाठी सहकार्य करतील. चला करू या सराव आणि मित्र-मैत्रिणींकडून आलेल्या सूचनांप्रमाणे आवश्यक बदल करू. सादरीकरणासाठी पुन्हा तयार होऊ.

या सर्व गोष्टी लक्षात ठेवल्या की मग साहित्यासहित सराव छान होईल आणि सादरीकरण सहज व मनोरंजक होईल .

- विविध प्रकारचे प्रसंग देऊन गटात वर्गात सादरीकरण करून घ्यावे. इतर मुलांना त्यावर सूचना व प्रतिक्रिया देण्यास सांगावे. आलेल्या सूचनांचे पालन करून पुन्हा सादरीकरण करण्याची संधी द्यावी.
- सादरीकरणातील टप्प्यांचे महत्व समजण्यासाठी विविध प्रसंगाचे गटात वैयक्तिक सादरीकरण करण्याची संधी द्यावी.

CG -2
C - 2.1
LO-04AE27
04AE28
04AE29

## ओळख तांत्रिक अंगांची





कला सादर करणाऱ्याला म्हणती कलाकार,
स्टेज किंवा व्यासपीठ आता **रंगमंच** बनवणार.
नाटकांमध्ये कलाकारांना म्हणतात पात्र,
सराव म्हणजे प्रॅक्टिस करतात अहोरात्र.





वेगवेगळ्या लाईट्सने रंगमंच जातो उजळून,
**प्रकाश योजना** म्हणजे पहा थोडी जवळून.
जसा करायचा रोल, तसे कपडे घालू अंगात,
नाटकाच्या भाषेत त्याला **वेशभूषा** म्हणतात.





चेहऱ्यावर रंग लावू, बसू मेकअप करायला,
**रंगभूषा** म्हणती या नाटकापूर्वीच्या कृतीला.
**केशभूषा** म्हणजे हेअर स्टाईल करून पाहू,
केसांचा टोप म्हणजे डोक्यावर विग लावू .
संवाद म्हणताना मागे संगीत ऐकू येते जरा,
**पार्श्वसंगीतामुळे** तर प्रसंग वाटतो खराखुरा .





रंगमंचावर नाटकात जे जे साहित्य वापरतो,
त्या सगळ्याच वस्तूंचा समावेश **नेपथ्यात** होतो.
अभिनयाला जोड असते या साऱ्या गोष्टींची,
आता ओळख झाली आम्हां **तांत्रिक अंगाची**.

**–अमोल जाधव**

नाटकात कोणकोणत्या तांत्रिक गोष्टी वापरल्या जातात याचा आपल्याला परिचय झाला. हळूहळू आपण या सगळ्या तांत्रिक अंगांचा वापर करणार आहोत. आता एक प्रसंग पाहू.

- तांत्रिक अंगांची ओळख कवितेच्या माध्यमातून करून द्यावी.
- विद्यार्थ्यांना तांत्रिक बाबींचा वापर करून सादरीकरणाची संधी द्यावी.

CG –3
C – 3.2
LO–04AE34

**प्रसंग**

राजू, सुलताना व रिटा मैदानावर खेळत होते. त्यांना खेळता-खेळता पन्नास रुपयांची नोट सापडली. सुलतानाने ती दोघांना दाखवली. त्यांनी आजूबाजूला पाहिले तर कोणीच दिसत नव्हते. त्यामुळे नोट कोणाची हे समजेना. राजू म्हणाला, ''कोणी दिसत नाही तर हे पैसे आपलेच समजू या.'' त्याने रस्त्याच्या पलीकडे असणाऱ्या दुकानात जाऊन खाऊ घेण्याची कल्पना मांडली. रिटा मात्र तयार नव्हती. तिला भीती वाटली. सुलतानासुद्‌धा राजूला नको म्हणाली, ''दुसऱ्या कोणाचे पैसे का घ्यावे? जे आपले नाही त्यावर आपला हक्क नाही'', असे सांगून सर्वांनी ते पैसे वर्गात मॅडमकडे दिले. दुसऱ्या दिवशी प्रार्थनेच्या वेळी ती नोट कोणाची आहे हे विचारले जाणार होते व ज्याची असेल तो ओळख पटवून ती नोट घेऊन जाणार होता.

या प्रसंगात राजू, सुलताना, रिटा आणि मॅडम असे चौघे जण आहेत. म्हणजेच ही चार पात्रे आहेत. आता या पात्रांसाठी या प्रसंगाचे संवाद तयार करू या, म्हणजे या प्रसंगाचे सादरीकरण करता येईल.

**संवाद**

(राजू , सुलताना व रीटा मैदानावर खेळत आहेत.)

**राजू –** पकड, पकड, ये पकड.

**सुलताना –** थांब रे, तुला काय वाटलं मी तुला पकडू शकणार नाही? पण त्याआधी रिटाला आऊट करते.

**रिटा –** हो का? मला बाद करणार का? करूनच दाखव.

**सुलताना–** हो करणारच आहे, तेही दोघांना एकदम!

**राजू–** अरे, इकडे या. हे बघा मला काय सापडलं.

**रिटा –** काय रे? काय सापडलं?

**राजू –** हे बघ काय आहे.

**सुलताना–** बापरे! पन्नास रुपयांची नोट.

**रीटा –** कोणाची आहे ती आणि इथे कशी काय?

**राजू –** मला नाही माहीत आणि आजूबाजूला सुद्‌धा कोणी दिसेना. सगळी मुलं वर्गात सुद्‌धा गेली. मला काय वाटतं, आपण ही नोट घेऊ आणि त्या पलीकडच्या दुकानातून खाऊ आणू.

- संवादांच्या आधारे पात्र, प्रसंग आणि स्टेज यांचा योग्य वापर करण्यासाठी शरीराकृतीचा वापर करून सादरीकरण करावे.

CG –3
C – 3.2
LO–04AE33

**सुलताना –** नको बाबा, दुसऱ्याचे पैसे आपण का घ्यायचे? ज्यावर आपला हक्क नाही ते घ्यायचेच कशाला? मी नाही तुमच्या सोबत येणार.

**रिटा –** सुलताना म्हणते ते खरं आहे. दुसऱ्याच्या पैशातून घेतलेला खाऊ मी नाही खाणार.

**राजू–** अरे, मग या पन्नास रुपयांचे करायचे काय?

**सुलताना–** आपण हे पैसे आपल्या मॅडमकडे देऊ या.

**रीटा–** हो चला जाऊ वर्गात, चला.

**( सगळे मॅडमकडे जातात.)**

**मॅडम–** काय रे मुलांनो? का आलात?

**सुलताना–** मॅडम, हे पैसे आम्हांला मैदानावर सापडले. तुम्हांला द्यायला आलोय. मॅडम, हे कोणाचे पैसे आहेत आम्हाला माहीत नाही. आपण उद्या प्रार्थनेच्या वेळी सर्व मुलांना विचारू. ज्याचे पैसे असतील तो ओळख पटवून घेऊन जाईल.

**मॅडम –** खरोखर तुम्ही प्रामाणिक मुलं आहात. आपल्या शाळेला तुमच्यासारख्या विद्यार्थ्यांचा अभिमान आहे.

वर्गातच याचे सादरीकरण करता येईल म्हणजे आपल्याला नाट्यगृह तयार करावे लागेल. यासाठी बाकांची रचना थोडी बदलून फळ्याच्या समोरची जागा मोकळी करून घेऊ म्हणजे पात्रांना हालचाल व ये–जा करायला जागा मिळेल. मुलांच्या शरीराकृतीचा पडदा बनवू. तो पडदा बाजूला सरकवताना मुले डाव्या व उजव्या बाजूला सरकतील व सादरीकरण करता येईल.

## प्रकाश योजना निसर्गाची

आपण गोष्ट निवडली. त्यावर संवाद तयार केले. त्यातील पात्रे निवडून सराव सुरू केला. त्याला योग्य असे संगीत देण्यासाठी साहित्यदेखील निवडले. आता पात्रांना योग्य वेशभूषा करून सराव सुरू केला. आपल्या मित्रांनी ज्या सुधारणा सांगितल्या, त्याप्रमाणे थोडा बदल केला व आता वर्गातच आपले नाट्यगृह तयार करून त्याचा सराव सुरूदेखील केला. परंतु आपल्या नाटकात किंवा त्या प्रसंगात जर रात्र, सकाळ, दुपार हे प्रहर दाखवायचे असेल तर काय करायचे?

त्यासाठी एक युक्ती करू या.

रात्र दाखवण्यासाठी वर्गाचे दार व खिडक्या बंद करा. म्हणजे होईल अंधार आणि दिसेल रात्र.

दार आणि खिडक्या हळूहळू उघडल्या की होईल पहाट.

पूर्णपणे प्रकाश आत आला की झाली सकाळ.

मग पुन्हा हळूहळू याच प्रकारे दार व खिडक्या बंद केल्या, की आपल्या नाटकातली होईल रात्र.

- मानवी शरीरकृतींचा सादरीकरणात योग्य वापर करून घ्यावा.
- रंगमंचावर नैसर्गिक प्रकाशयोजनेसाठी वर्गातील दारे, खिडक्या यांच्या वापराविषयी विद्यार्थ्यांना माहिती द्यावी.
- संपूर्ण सादरीकरण करण्यासाठी पाठ्यपुस्तकातील प्रसंग निवडण्याची संधी द्यावी.

CG –3/4
C – 3.2/4.1
LO–04AE33/34 /35/36

### लक्षात ठेवा

**ब्लॅक आऊट**

नाटकातील दोन दृश्यांमध्ये काही सेकंदाचा अंधार केला जातो व पुन्हा रंगमंचावर प्रकाश येऊन पुढचे दृश्य सुरू होते. या मधल्या काळातल्या अंधार असणाऱ्या वेळेला नाटकाच्या भाषेत 'ब्लॅकआऊट' असे म्हणतात.



## माझी कृती

१. पाठ्यपुस्तकातील एखादा प्रसंग निवडून त्यावर आधारीत संवाद तयार करा. आवश्यक साहित्य, वेषभूषा, ध्वनी व प्रकाशयोजना यांचा वापर करून गट सादरीकरण करा.


संगीत

# ९. सारे मिळून गाऊ या!

दैनंदिन जीवनात आपण अनेक प्रकारचे संगीत ऐकत असतो. जसे की शाळेत प्रार्थना, राष्ट्रगीत म्हणतो किंवा गाण्याच्या भेंड्या खेळतो. अशाच काही छान गाण्यांची ओळख करून घेणार आहोत. चला तर मग सारे मिळून गाऊ या, नाचू या, आनंद घेऊ या!

## सरस्वती वंदना

भारतीय संस्कृतीत सरस्वती मातेस केवळ ज्ञानाचीच नाही तर सर्व ललितकलांची जननी मानली गेली आहे. या सरस्वती मातेच्या एका प्रार्थनेने आपण सुरूवात करू या.

नमस्ते शारदे देवी, सरस्वती मति प्रदे।
वस त्वं मम जिव्हाग्रे, सर्व विद्या प्रदाभव॥

(**अर्थ**) : हे शारदा आणि बुद्धी देणाऱ्या सरस्वती देवी, तुला माझा नमस्कार असो. तू माझ्या जीभेच्या टोकावर (जिव्हाग्रावर) निवास कर आणि मला सर्व प्रकारच्या विद्या प्रदान कर.

नमस्ते शारदे देवी, वीणापुस्तक धारिणी।
विद्यारंभं करिष्यामि, प्रसन्ना भव सर्वदा॥

(**अर्थ**) : हातात वीणा आणि पुस्तक धारण करणाऱ्या हे शारदा देवी, तुला माझा नमस्कार असो. मी आता अभ्यासाला सुरूवात करणार आहे. त्यामुळे तू सदैव प्रसन्न राहा.



- सरस्वती वंदनाचा तालासुरात सराव करून घ्यावा.
- सरस्वती वंदनाच्या सादरीकरणात सर्वांचा सहभाग घ्यावा.
- प्रथम पृष्ठावरील क्यूआर कोड स्कॅन करून तालासुरात सराव करून घ्यावा.

CG – 1
C – 1.1
LO–04AE40

## देशभक्ती गीत

आपल्यात राष्ट्रप्रेम, साहस, कर्तव्याची जाणीव जागृत करण्यासाठी देशभक्तीगीत गायले जाते. चला तर मग असेच देशभक्तीपर गीत ऐकू या व टाळ्यांच्या साहाय्याने तालासुरात गाऊ या.



### उठा राष्ट्रवीर हो

उठा राष्ट्रवीर हो, सज्ज व्हा उठा चला
सशस्त्र व्हा, उठा चला, उठा राष्ट्रवीर हो ॥धृ॥

युद्ध आज पेटले, जवान चालले पुढे
मिळून सर्व शत्रूला क्षणात चारू या खडे
एकसंघ होऊनी लढू चला, लढू चला
उठा उठा, चला चला ॥१॥

वायुपुत्र होऊनी धरू मुठीत भास्करा
होऊनी अगस्तीही पिऊन टाकू सागरा
रामकृष्ण होऊ या, समर्थ होऊ या चला
उठा उठा, चला चला ॥२॥

चंद्रगुप्त वीर तो फिरून आज आठवू
शूरता शिवाजीची नसानसांत साठवू
दिव्य ही परंपरा, अखंड चालवू चला
उठा उठा, चला चला ॥३॥

यज्ञकुंड पेटले प्रचंड हे सभोवती
दुष्ट शत्रू मारूनी तयात देऊ आहुती
देवभूमी ही अजिंक्य, दाखवू जगा चला
उठा उठा, चलाचला ॥४॥

कवी– रविंद्र भट

- देशभक्तीपर समूहगीत तालासुरात गायन करून घ्यावे.
- राष्ट्रीय एकात्मतेचे महत्व सांगावे.
- टाळीच्या आधारे ठेका देण्यास सांगणे व गायन करून घ्यावे.
- प्रथम पृष्ठावरील क्यूआर कोड स्कॅन करून तालासुरात सराव करून घ्यावा.

CG – 1
C – 1.1/1.2
LO–04AE41/42

पावसात भिजायला कोणकोणाला आवडते? पाऊस पडल्यानंतर मनात उत्साह निर्माण होतो, त्या वेळी आपण काय करतो. आज आपण पावसावर आधारीत हे गीत अभिनयासह म्हणू या.

## धोय धोय पाऊस

धीतां ता, धीतां ता, धीतां ता धीतां
धोय धोय धोय धोय
पाऊस पडतोय रे
धीतां ता, धीतां ता
माझ्या मनीचा मोर कसा नाचतोय रे
तकिट धा, तकिट धा ॥धृ॥

पाऊस रानात, पाऊस पानात
पाऊस वाऱ्यात, डोंगर दऱ्यात
टेरेस, बाल्कनी भिजवून जातोय रे ॥१॥

झिम्माड पाऊस, वेल्हाळ वाटतो
नदीत तुफान दुथडी वाहतोय
रेनकोट नसताना पाऊस गाठतोय रे ॥२॥

मुसळधारांनी पडतो पाऊस
वाकडातिकडा कोसळतो पाऊस
चारही दिशांनी पाऊस झोडतोय रे ॥३॥

कवी – चारुता प्रभुदेसाई



- गीताचा अभिनयासह सराव करून घ्यावा.
- सर्वांच्या सहभागाने गीताचे सादरीकरण अभिनयासह तालासुरात करून घ्यावे.
- प्रथम पृष्ठावरील क्यूआर कोड स्कॅन करून तालासुरात सराव करून घ्यावा.

CG – 1
C – 1.1
04AE40/ 41

**आणखी काही परिचित गीते गाऊ या.**

**प्रार्थना**

तू बुद्‌धि दे, तू तेज दे, नवचेतना विश्वास दे
जे सत्य सुंदर सर्वथा आजन्म त्याचा ध्यास दे ॥ ध्रृ ॥

हरवले आभाळ ज्यांचे हो तयांचा सोबती
सापडेना वाट ज्यांना हो तयांचा सारथी
साधना करिती तुझी जे नित्य तव सहवास दे ॥ १ ॥

जाणवाया दुर्बलांचे दुःख आणि वेदना
तेवत्या राहो सदा रंध्रातुनी संवेदना
धमन्यांतल्या रुधिरास या खल भेदण्याची आस दे
सामर्थ्य या शब्दांस आणि अर्थ या जगण्यास दे ॥ २ ॥

सन्मार्ग आणि सन्मती लाभो सदा सत्संगती
नीती ना ही भ्रष्ट हो जरी संकटे आली किती
पंखात या बळ दे नवे, झेपावण्या आकाश दे ॥ ३ ॥

कवी– गुरू ठाकूर



- विविध गीत प्रकार ऐकवून त्यांतील फरक सांगावा.
- विविध गीतांचा सराव करून घ्यावा व प्रत्येकास सादरीकरणाची संधी द्यावी.
- प्रथम पृष्ठावरील क्यूआर कोड स्कॅन करून तालासुरात सराव करून घ्यावा.

CG – 1
C – 1.1
LO–04AE40

**बालगीत– शाळेला छान छान बनवायचं**

साऱ्यांनी मिळून ठरवायचं
शाळेला छान छान बनवायचं ॥धृ॥
करायचा नाही कागद कचरा
शाळेचा चेहरा ठेवायचा हसरा
झाडा फुलांनी नटवायचं ॥१॥
थेंब थेंब पाण्याचा वाचवायचा
जपायचा आणि साचवायचा
ताई – दादाला सांगायचं
शाळेला छान छान बनवायचं ॥२॥

कवी – राजेंद्र सोमवंशी



**अभंग**

वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे। पक्षी ही सुस्वरे आळविती॥ धृ ॥
येणे सुखे रुचे एकांताचा वास। नाही गुणदोष अंगा येत ॥१॥
आकाश मंडप पृथ्वी आसन। रमे तेथे मन क्रीडा करी॥२॥
कंथा, कमंडलू देह उपचारा, जाणवितो वारा अवसरु॥३॥
हरिकथा भोजन परवडी विस्तार। करोनि प्रकार सेवु रुची॥४॥
तुका म्हणे होय मनासी संवाद। आपुलाचि वाद आपणासी॥५॥

– संत तुकाराम



**विविध गीतप्रकारांविषयी गटात चर्चा करा व त्यातील फरक ओळखा.**

- गीतातील चढउतार कसे असतात याविषयी विद्यार्थ्यांमध्ये चर्चा घडवून आणावी.
- प्रथम पृष्ठावरील क्यूआर कोड स्कॅन करून तालासुरात सराव करून घ्यावा.

CG –1/2
C – 1.1/2.2
LO–04AE40
/45

## माझी कृती

१) पाठातील अभ्यासलेल्या गीतप्रकारांची नावे लिहा.

अ. ........................ ब. ........................ क. ........................

ड. ........................ इ. ........................ ई. ........................

२) आवडते गीत लिहा.

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

- विविध गीत प्रकारांची माहिती देऊन त्याविषयी गटात चर्चा घडवून आणावी.
- प्रथम पृष्ठावरील क्यूआर कोड स्कॅन करून तालासुरात सराव करून घ्यावा.

CG –2
C – 2.2
LO – 04AE
45

विनामूल्य वितरणासाठी



# १०. एकल, युगल व समूहगीत



**चित्रातील गीतप्रकार ओळखा.**





जेव्हा आपण एकटेच गाणे म्हणतो तेव्हा त्यास 'एकल गीत' म्हणतात. तर दोघांनी गाणी गायले तर त्यास 'युगल गीत' म्हणतात.

आपण अशाच काही एकल व युगल गीतांचा आनंद घेऊ या!

## एकल गीत



मारू बेडूकउडी गड्यांनो, घालू या लंगडी
लपाछपी खेळता देऊ या, झाडामागे दडी!
सुट्टी लागली सरली शाळा
कोण पहाटे उठतो खुळा !
"अभ्यासाला बसा!" कुणी ना ओरडते घडीघडी ॥१॥

गावाबाहेर वाहे नदी
झाडे बघती पाण्यामधी
सळसळणाऱ्या लाटांमध्ये, घेईल कोणी बुडी? ॥२॥

कुणी पाडतील चिंचा बोरे
एक आकडा मलाही दे रे
झाडाखाली कुणी बापडा, लावील लाडीगोडी ! ॥३॥

गीत – शांता शेळके

**लक्षात ठेवा :**

एकट्याने गायलेल्या गीतास **एकल गीत** व दोन व्यक्तींनी गायलेल्या गीतास **युगल गीत** म्हणतात.

- एकल व युगल गीताविषयी विद्यार्थ्यांसोबत चर्चा करा.
- प्रथम पृष्ठावरील क्यूआर कोड स्कॅन करून तालासुरात सराव करून घ्यावा.

CG –2
C – 2.1
LO–04AE43

## एकल गीत

चंदाराणी, चंदाराणी,
का गं दिसतेस थकल्यावानी ॥धृ॥

शाळा ते घर, घर ते शाळा
आम्हां येतो कंटाळा,
रात्रभर तू चाल चालसी,
दिवसा तरी मग कोठे निजसी ? ॥१॥

वारा वादळ छप्पन वेळा,
थारा नाही आभाळा,
कसा गडे तू तोल राखिसी,
पुढती पुढती पाय टाकिसी, ॥२॥

काठी देखील नसते हाती,
थोडी नाही विश्रांती,
चढती कैसी, कशी उतरसी,
निळ्या डोंगरी अखंड फिरसी ॥३॥

वाडा घरकुल घरटे नाही,
आई नाही अंगाई।
म्हणुनीच का तू अवचित दडसी,
लिंबामागे जाऊन रडसी ॥४॥



कवी – ग. दि. माडगूळकर

### एकल गीत उदाहरणे –

१) आई, बघ ना कसा हा दादा
२) चुलीवरची खीर एकदा पुरीला हसली
३) फुलपाखरू झालो रे मी फुलपाखरू झालो
४) बे एके बे, बे दुणे चार

- एकलगीताचा टाळीच्या सहाय्याने तालासुरात सराव करून घ्यावा.
- प्रथम पृष्ठावरील क्यूआर कोड स्कॅन करून तालासुरात सराव करून घ्यावा.

CG –1/2
C – 1.1/2.1
LO–04AE41 /43

## युगलगीत – ‘‘आला आला वारा’’

आला आला वारा संगे पावसाच्या धारा
पाठवणी करा सया निघाल्या सासुरा॥धृ॥

नव्या नवतीचं बाई लकाकतं रूप
माखलं ग ऊन जणू हळदीचा लेप
ओठी हसू पापणीत आसवांचा झरा॥१॥

आजवरी यांना किती जपलं जपलं
काळजाचं पाणी किती शिंपलं शिंपलं
चेतवून प्राण यांना दिला गं उबारा ॥२॥

येगळी माती आता गं येगळी दुनिया
आभाळाची माया बाई, करील किमया
फुलंलं बाई पावसानं मुलख गं सारा ॥३॥

कवी – सुधीर मोघे



- युगल गीताचा सराव करून सादरीकरण करून घ्यावे.
- युगल गीतांविषयी विद्यार्थ्यांशी चर्चा करा.
- प्रथम पृष्ठावरील क्यूआर कोड स्कॅन करून तालासुरात सराव करून घ्यावा.

CG –2
C – 2.1/2.2
LO – 04AE44/45

## युगलगीत

नाही खर्चली कवडीदमडी, नाही वेचला दाम
विकत घेतला श्याम, बाई मी विकत घेतला
श्याम ! ॥धृ॥

बाळ गुराखी यमुनेवरचा
गुलाम काळा संताघरचा
हाच तुक्याचा विठ्ठल आणि दासाचा श्रीराम ।

कुणी म्हणे ही असेल चोरी
कुणा वाटते असे उधारी
जन्मभरीच्या श्वासाइतुके मोजियले हरिनाम !

जितके मालक तितकी नावे
हृदये तितकी याची गावे
कुणी न ओळखी तरीही याला दीन अनाथ अनाम !

गीत– ग.दि. माडगूळकर



### युगल गीत उदाहरणे :

१) सूर लागला आज
२) शेपटीवाल्या प्राण्यांची पूर्वी भरली सभा
३) एक झोका... चुके काळजाचा ठोका
४) एकटी एकटी घाबरलीस ना? वाटलंच होतं आई... म्हणूनच तर सोडून तुला, लांब गेलो नाही।

- युगलगीताचा तालासुरात सराव करून घेऊन सादरीकरण करून घ्यावे.
- प्रथम पृष्ठावरील क्यूआर कोड स्कॅन करून तालासुरात सराव करून घ्यावा.

CG –1/2
C – 1.1/2.1
LO–04AE40
/44

## समूहगीत

आपण शाळेत दररोज परिपाठाच्या वेळी प्रार्थना, राष्ट्रगीत, राज्यगीत म्हणतो त्या वेळी आपण सर्व जण एका सुरात, लयीत गातो बरोबर ना!

तीन किंवा तीनपेक्षा जास्त व्यक्तींनी एकत्रितपणे गायलेल्या गीतास '**समूहगीत**' असे म्हणतात. समूहगीतामुळे सहकार्याची भावना वाढते तसेच आत्मविश्वास वाढतो. चला तर मग आपणही काही समूहगीतांचा आनंद घेऊ या.

### शूर आम्ही सरदार...

शूर आम्ही सरदार आम्हांला काय कुणाची भिती?
देव देश अन् धर्मापायीं प्राण घेतलं हाती!।।ध्रृ।।

आईच्या गर्भात उमगली झुंजाराची रित
तलवारीशी लगीन लागलं जडली येडी प्रीत
लाख संकटं झेलून घेईल अशी पहाडी छाती!।।१।।

जिंकावे वा कटुन मरावं हेंच आम्हांला ठावं
लढून मरावं, मरून जगावं हेंच आम्हाला ठावं
देशापायी सारी विसरू माया ममता नाती!।।२।।

गीत – शांता शेळके





### या भारतात बंधुभाव...

या भारतात बंधुभाव नित्य वसू दे, दे वरचि असा दे
हे सर्व पंथ संप्रदाय एक दिसू दे, मतभेद नसू दे।।

नांदोत सुखे गरीब–अमीर एक मतांनी
मग हिंदू असो ख्रिश्चन वा हो इस्लामी
स्वातंत्र्य–सुखा या सकलांमाजि वसू दे
दे वरचि असा दे।।

गीत – राष्ट्रसंत तुकडोजी महाराज

- समूहगीतांविषयी चर्चा करावी.
- विविध समूहगीते तालासूरात म्हणून घ्यावी.
- प्रथम पृष्ठावरील क्यूआर कोड स्कॅन करून तालासुरात सराव करून घ्यावा.

CG –2
C – 2.1
LO–04AE44

## माझी कृती

१) तुला आवडणाऱ्या एकल गीतांची यादी करावी. त्यातील आवडते गीत सराव करून वर्गात सादर करा.

.....................................................................................................

.....................................................................................................

.....................................................................................................

.....................................................................................................

.....................................................................................................

.....................................................................................................

.....................................................................................................

.....................................................................................................

२) आवडीचे युगलगीत लिहा. वर्गातील सहकार्यांच्या मदतीने युगल गीताचा सराव करून तालासुरात सादर करा.

.....................................................................................................

.....................................................................................................

.....................................................................................................

.....................................................................................................

.....................................................................................................

.....................................................................................................

.....................................................................................................

.....................................................................................................

# ११. गीत परंपरेचे

**लोकांनी लोकांसाठी निर्माण केलेले संगीत म्हणजे लोकसंगीत.**



वासुदेव आला हो
वासुदेव आला...



भलगरी दादा भलरी...



विंचू चावला
विंचू चावला...



वल्हव रे नाखवा वल्हव रे...



काठी न् घोंगडं घेऊ द्या की रं...

## पुढील प्रश्नांवर वर्गात चर्चा करा

वरील गीतप्रकार तुम्ही ऐकले आहेत का? कोणत्या प्रसंगी ऐकले आहेत? वरील गीतांमध्ये कोणती वाद्ये वाजवली आहेत? तुमच्या गावात कोणकोणते सण-उत्सव साजरे केले जातात? त्यामध्ये कोणती गाणी गायली जातात?

आज आपण अशाच काही गीतांचा परिचय करून घेणार आहोत. आपल्या गावात सण-उत्सवात किंवा आनंदाच्या प्रसंगी जी गाणी गातात त्याला लोकसंगीत असे म्हणतात. उदा. वासुदेव गीत, गोंधळी, भारूड, भोंडल्याची गाणी इत्यादी.

- लोकसंगीताविषयी सविस्तर माहिती सांगून त्याविषयी चर्चा करावी.
- लोकगीतांमधील लोकजीवन व संस्कृती यावर चर्चा करावी.
- प्रथम पृष्ठावरील क्यूआर कोड स्कॅन करून तालासुरात सराव करून घ्यावा.

CG -4
C - 4.1/4.2
LO-04AE51/53

**कोकणातील विविध उत्सवाच्या प्रसंगी सुरुवातील गायले जाणारे नमन गीत.**

गणा धाव रे मला पाव रे॥धृ॥

तुझ्या प्रेमाचे किती गुण गाऊ रे

तू दर्शन आम्हाला दाव रे ॥१॥

तुझ्या कृपेची छाया असू दे

ध्यानी-मनी नाम तुझे ठसू दे ॥२॥

माझी वादलात सापडली नाव रे

दूर किनारी हाय माझा गाव रे ॥३॥





**तुम्हांला माहीत आहे का?**

हे गीत प्रामुख्याने कोकणामध्ये विविध उत्सवाच्या सुरुवातीला नृत्याच्या माध्यमातून सादर केले जाते. याला जाखडी नृत्य असे म्हणतात. नर्तकांच्या समूहाच्या मध्यभागी ढोलकी, मृदंग, झांज वाजवणारे आणि गाणारे बसतात.

**नर्तक (बाल्या):** त्यांच्याभोवती बाल्या (नर्तक) पायात घुंगरू (चाळ) बांधून गोलाकार फेर धरून नाचतात.

- गीताचा सराव करून घ्यावा. गीतांसाठी लागणारे वाद्य व त्यांची माहिती द्यावी.
- कोकणातील विविध उत्सवाबाबत चर्चा करावी व उत्सवात जाखडी नृत्य गायनात वाजवल्या जाणाऱ्या वाद्यांविषयी चर्चा करावी.
- प्रथम पृष्ठावरील क्यूआर कोड स्कॅन करून तालासुरात सराव करून घ्यावा.

CG -4
C - 4.1/4.2
LO-04AE51
/52/53

**गोंधळगीत महाराष्ट्रातील एक प्राचीन लोकप्रिय कलाप्रकार आहे. आदिशक्ती देवीच्या उपासनेसाठी हा गोंधळ गीत प्रकार गायला जातो.**

**गोंधळ**



**होऊ दे सर्वदिशी मंगळ**
**झडवितो रात्रंदिन संबळ**
**खुलवितो दिवटी दीप कळी,**
**आम्ही अंबेचे गोंधळी**
**(उधे गं अंबे उधे)**
**घरोघरी हिंडतो न् गोंधळ आईचा मांडतो**
**आईचा मांडतो न् गोंधळ देवीचा मांडतो**
**भवानी बसली ओठीगळी**
**आम्ही अंबेचे गोंधळी॥**

**कवी– शाहीर साबळे**

गोंधळ गीतात प्रामुख्याने हार्मोनिअम, तुणतुणे, संबळ, टाळ, झांज, दिमडी अशी वाद्ये वापरली जातात.

**कोळीगीत**



**चांदवा आला नभांगणी .. दर्या उसळला।**
**धुंद पिठोरी पुनव हासली .. आनंद गो झाला**
**चंदेरी दुनिया चमकती.. दर्याला भाषा उमगती ।**
**वल्हव सारंगा.. नाव दे लोटून, सोडून जाऊ बंदराला**
**मनात लाटा फेसाळती तुषार सुखात भिजवती।**
**गार गार वारा.. जीव बावरां.. आलीया भरती किनाऱ्याला।**
**माखून घेऊ चांदण्याला.. पिठोरी एकांत संगतीला**
**खर्जात लाटा– जुळलंय गाणं.. लागंल मासळी जाल्याला**

**कवी – राजेंद्र अत्रे**

कोळीगीतासाठी ढोलकी, घुंगरू, हार्मोनिअम, झांज ही वाद्य वापरली जातात.

**तुम्हाला माहीत आहे का?**
कोकणातील कोळी बांधव आपल्या बोलीभाषेत सण–उत्सवात आनंद प्रसंगी हे गीत गातात.

- वरील गीतांचा सराव करून घ्यावा.
- विविध लोकगीत प्रकारांची चर्चा करावी.
- प्रथम पृष्ठावरील क्यूआर कोड स्कॅन करून तालासुरात सराव करून घ्यावा.

CG –4
C – 4.1/4.2
LO–04AE51
/52/53

**वासुदेव ही महाराष्ट्रातील एक अत्यंत प्राचीन आणि वैशिष्ट्यपूर्ण परंपरा आहे. ही परंपरा प्रामुख्याने समाज प्रबोधन व भक्तीचा प्रसार करण्यासाठी ओळखली जाते.**

## वासुदेव गीत

वासुदेव आला
वासुदेव आला...

पहाट झाली स्वारी आली
अहो सूर्य देव हा जागा झाला....
वासुदेव आला वासुदेव आला.....

गळा घालून तुळशीची माळ,
हाती घेऊन चिपळ्या टाळ
म्हणे मुखाने हरिनाम बोला....
वासुदेव आला वासुदेव आला....

जगण्याचं देई भान
मागतो पसाभर दान
चला देऊ या दूधभात काला
वासुदेव आला वासुदेव आला...



गीत– राजेंद्र सोमवंशी

वासुदेव गीतासाठी – चिपळ्या, टाळ, बासरी, पायातील घुंगरू इत्यादी वाद्ये वापरतात.

- **उपलब्ध साहित्याचा उपयोग करून वासुदेव गीत म्हणा.**

- वासुदेव गीताबद्दल माहिती सांगावी.
- लोकगीत प्रकारांवर चर्चा करावी.
- प्रथम पृष्ठावरील क्यूआर कोड स्कॅन करून तालासुरात सराव करून घ्यावा.

CG –3/4
C – 3.1/4.2
LO–04AE48 / 52/53

**लोकगीतातील आणखी एक लोकप्रिय प्रकार म्हणजे भारुड. समाजामध्ये गीताच्या माध्यमातून साक्षात्कार, अंधश्रद्धा इत्यादी बाबींचे प्रबोधन करण्यासाठी हे भारूड सादर करतात.**

### भारूड

(चाल– या शेजारणीनं बरं नाही केलं गं बया..)
ह्या शाळेमंदी शिकलो आम्ही बया।
या शाळेनं मला मोठं केलं बया॥
शिकू या सारे शिकू या
लिहा वाचाया! शिकू या!
ज्ञानाच्या वाटेवर आपण सारे चालू या ॥१॥
शाळेत खेळू, शिकू, अन् बागडू या
वाचन, लेखन सारं हास–हासत शिकू या ॥२॥
ज्ञान हेच खरे धन आहे
हे साऱ्यांना समजून सांगू या।
सुंदर आपुला देश घडवू
पुढे पुढे जाऊ या, हुशार होऊ या,
मोठे मोठे होऊ या .... ॥३॥



**भारूडासाठी हार्मोनिअम, मृदंग, टाळ, ढोलकी इत्यादी वाद्ये वापरली जातात.**

**तुम्हाला माहीत आहे का?**

संत एकनाथ महाराजांनी सोळाव्या शतकात भारूड या काव्यप्रकाराला खऱ्या अर्थाने लोकप्रियता मिळवून दिली व या माध्यमातून समाजप्रबोधनाचे कार्य केले.

- विद्यार्थ्यांशी भारूड गीतप्रकार या विषयी चर्चा करावी.
- प्रथम पृष्ठावरील क्यूआर कोड स्कॅन करून तालासुरात सराव करून घ्यावा.

CG-4
C– 4.2
LO-04AE52

## लोकवाद्यांचा परिचय


ढोल


ढोलकी


झांज


तारपा


डफ


लेझीम


संबळ


तुणतुणे


चिपळ्या


खंजिरी

चित्रातील वाद्ये तुम्ही कोणत्या लोकगीतात पाहिली आहेत? त्यापैकी कोणकोणत्या वाद्यांचे आवाज ऐकले आहेत? चर्चा करा.

**खालील चित्रात दाखवलेल्या वाद्यांचे निरीक्षण करून वाद्यांची योग्य नावे लिहा.**


..............


..............


..............


..............


..............

- चित्रातील वाद्यांची माहिती द्यावी व त्यांचे आवाज ऐकवावे.
- सदर वाद्ये कोणकोणत्या गीतप्रकारात वाजवतात यांविषयी चर्चा करावी.

CG – 3
C – 3.2
LO–04AE 49

## माझी कृती

**१) लोकसंगीतात वापरल्या जाणाऱ्या वाद्यांची नावे लिहा.**




**२) परिसरातील गायले जाणारे आवडीचे लोकगीत लिहा.**

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

**३) पुढील लोकसंगीतात कोणकोणती वाद्ये वापरली जातात ते लिहा.**

अ] अभंग-भजन- ..........................................................................

ब] पोवाडा ..........................................................................

क] भारुड ..........................................................................

ड] वासुदेव गीत ..........................................................................

- लोकसंगीत वाद्यांची चर्चा करून त्यांची नावे सांगावी.
- आवडीचे लोकगीत लिहिण्यास सांगावे.

CG -3
C - 3.2
LO- 04AE49



# १२. स्वर वेल



निसर्गातील ध्वनी विविध स्वरांनी व तालांनी भरलेला एक मोठा वाद्यवृंद आहे. आपण परीसरातील विविध आवाज ऐकतो उदा. पक्ष्यांचा किलबिलाट, प्राण्यांचे आवाज, पावसाचा आवाज, वाहत्या पाण्याचा आवाज, पानांची सळसळ इत्यादी.

**खालील चित्रांतील निसर्गनिर्मित व मानवनिर्मित आवाज कोणते ते सांगा व लिहा.**

     

........... ........... ........... ........... ........... ...........

याशिवाय तुम्ही परिसरात ऐकलेले कोणते आवाज मधुर वाटले व कोणते आवाज कर्कश वाटले ते तक्त्यात लिहा.

| मधुर आवाज | कर्कश आवाज |
|---|---|
| | |
| | |
| | |

वरीलपैकी तुम्हांला आवडलेल्या आवाजाची नक्कल करा.

**लक्षात ठेवा :**

आपण आपल्या परीसरातील ऐकलेल्या आवाजांपैकी अनेक आवाज संगीतातील स्वरांशी जुळतात. जो आवाज कानाला मधुर वाटतो व त्याचा नाद अखंड टिकतो त्यास **संगीत उपयोगी ध्वनी** असे म्हटले जाते.

## संगीत उपयोगी ध्वनी.

शंखध्वनी, घंटानाद, बासरी वादन आणि ढोल ताशा असे हे संगीत उपयोगी ध्वनी आहेत. याशिवाय इतर आणखी कोणकोणते ध्वनी हे संगीतामध्ये वापरले जातात किंवा वापरता येतील याची यादी करून त्यासंदर्भात चर्चा करा.

- मधुर आवाज व कर्णकर्कश आवाजांविषयी चर्चा करून घ्यावी.
- विद्यार्थ्यांशी विविध आवाजांविषयी चर्चा करण्यास सांगावे.
- संगीत उपयोगी आवाजाची उदाहरणे सांगून चर्चा घ्यावी.

CG –3/4
C – 3.1/4.1
LO–04AE47/50

## स्वर व स्वरांचे प्रकार

**लक्षात ठेवा :**
कानाला मधूर वाटणाऱ्या आणि विशिष्ट कंपन संख्येच्या नादास 'स्वर' म्हणतात.

तुम्हांला अ, आ, इ, ई, ही अक्षरे माहीत आहेतच.

जसे मराठीचे लेखन व वाचन करण्यासाठी चौदाखडीची गरज असते तसेच संगीतात सात स्वर असतात त्यास 'सप्तक' असे म्हणतात.

**सा रे ग म प ध नि**

संगीतामध्ये सात स्वरांबरोबरच आणखी पाच स्वर पहायला मिळतात.

**स्वरांचे प्रकार – स्वरांचे तीन प्रकार आहेत.**

१) मूळ सात स्वरांना 'शुद्ध स्वर' म्हणतात. **सा रे ग म प ध नि**

२) जे स्वर मूळ जागेपेक्षा अर्ध्या स्वराने खाली गायले जातात त्यांना 'कोमल स्वर' असे म्हणतात. कोमल स्वर लिहीताना स्वराच्या खाली '_' आडवी रेष असे चिन्ह देतात. **रे ग ध नि**

३) जो स्वर मूळ जागेपेक्षा अर्धा स्वर उंच गायला जातो त्यास 'तीव्र स्वर' असे म्हणतात. तीव्र स्वर ओळखण्यासाठी स्वराच्या डोक्यावर उभी रेष देतात. **म**

**सात शुद्ध + चार कोमल + एक तीव्र स्वर मिळून = बारा स्वर तयार होतात.**

शुद्ध, कोमल व तीव्र अशा १२ स्वरांचा क्रम खालील प्रमाणे :

| सा | रे | रे | ग | ग | म | 'म | प | ध | ध | नि | नि |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| शुद्ध | कोमल | शुद्ध | कोमल | शुद्ध | शुद्ध | तीव्र | शुद्ध | कोमल | शुद्ध | कोमल | शुद्ध |

## स्वर अलंकार

**स्वरांची नियमित क्रमवार रचना म्हणजेच स्वरालंकार.**

खालील शुद्ध स्वर अलंकारांचा सराव करा.

**१) स्वरांचा चढता क्रम आरोह** – सारेग रेगम गमप मपध पधनि धनिसां

स्वरांचा उतरता क्रम अवरोह – सांनिध निधप धपम पमग मगरे गरेसा

**२) आरोह** – सारेगम रेगमप गमपध मपधनि पधनिसां

**अवरोह** – सांनिधप निधपम धपमग पमगरे मगरेसा

याप्रमाणे आणखी वेगवेगळ्या प्रकारे स्वरांचा आकृतिबंध तयार करून अलंकार तयार करा.

- स्वरांचा चढता क्रम व उतरता क्रम यावर चर्चा करावी.
- स्वर व स्वरांच्या प्रकारांमधील फरक सांगावा.
- प्रथम पृष्ठावरील क्यूआर कोड स्कॅन करून तालासुरात सराव करून घ्यावा.

CG –2
C – 2.2
LO–
04AE46

**लक्षात ठेवा :**

संगीतातील सप्तक परिपूर्ण होण्यासाठी तार सप्तकातील '**सां**' वापरला जातो.

**सा** आणि **प** – अचल स्वर (कोणतेही चिन्ह नाही).

_रे_ग_ध_नि – स्वरांच्या खाली रेघ म्हणजे कोमल स्वर.

ꞌम – स्वराच्या वर उभी रेषा म्हणजे तीव्र स्वर.

## माझी कृती

**अ] रिकाम्या जागा भरा.**

१. ---------- कोमल स्वर आहेत.

२. ---------- हा तीव्र स्वर आहे.

३. संगीतामध्ये ---------- शुद्ध स्वर आहेत.

**ब] अलंकार पूर्ण लिहा व सुरात गाण्याचा सराव करा.**

१. आरोह – सारेग रेगम ..........................................

अवरोह – सांनिध निधप ..........................................

२. आरोह – सारेगम रेगमप ..........................................

अवरोह – सांनिधप निधपम ..........................................

**क] स्वरांचे प्रकार लिहा.**

१. .......................... २. .......................... ३. ..........................

**ड] खालील चौकटीतील बारा स्वर पूर्ण करा.**

| सा | | रे | | ग | म | | प | _ध | | | नि |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

- अलंकारांचा सराव करून घ्यावा.
- उपलब्ध साधन किंवा हार्मोनिअम ॲपच्या माध्यमातून अलंकारांचा सराव करून घ्यावा.
- प्रथम पृष्ठावरील क्यूआर कोड स्कॅन करून तालासुरात सराव करून घ्यावा.

CG –2
C – 2.2
LO–04AE46

# १३. चला ताल धरू या...

आपल्या आवडीच्या गाण्याबरोबर आपले पाय नकळतपणे ताल धरतात तर कधी आपण बेंचवर हात आपटून ताल धरतो किंवा टाळी वाजवून ताल धरतो.

आता आपण एक खेळ खेळू या

ताट-चमचा किंवा वाटी-चमचा घेऊन एक दोन तीन चार, एक दोन तीन चार असा ताल धरू या किंवा प्लास्टिकच्या रिकाम्या बाटलीत वाळू किंवा डाळ भरून एक दोन तीन चार, एक दोन तीन चार, असा ताल धरू या.

**लक्षात ठेवा :**

गायन वादन व नृत्यामध्ये वेळ मोजण्याच्या शिस्तबद्ध पद्धतीला '**ताल**' असे म्हणतात.

संगीतामध्ये अनेक प्रकारचे ताल आहेत. तालामध्ये मात्रा, विभाग, सम, काल असे भाग असतात. या भागांची थोडक्यात माहिती घेऊ या!

१) **मात्रा** – ताल मोजण्यासाठी वापरलेला प्रत्येक एक ठोका म्हणजे '**मात्रा**' होय.

२) **विभाग** – तालातील मात्रांच्या लहान गटांना '**विभाग**' असे म्हणतात.

३) **सम** – तालाच्या पहिल्या मात्रेस सम असे म्हणतात. पहिल्या मात्रेवर जोरात टाळी वाजवून '**सम**' दाखवतात. सम हे 'X' चिन्हांने दर्शवतात.

४) **काल** – तालाची जी मात्रा टाळी न वाजवता हात हवेत बाजूला करून दाखवली जाते त्या मात्रेस '**काल**' असे म्हणतात. काल हे 'o' चिन्हांने दर्शवतात.

आज आपण संगीतातील दोन तालांची माहिती घेऊन टाळी वाजवून सराव करूया.

**ताल केहरवा**

मात्रा : ८ विभाग : २ ( ४ – ४ मात्रांचे)

सम : १ मात्रेवर काल : ५ मात्रेवर

| मात्र | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ठेका | धा | गे | न | ती | न | क | धी | न |
| चिन्ह | X | | | | o | | | |
| | सम | | | | काल | | | |

**पाठ्यपुस्तकातील 'चंदाराणी, चंदाराणी...' हे गीत केहरवा तालात आहे. तालाची टाळी धरून गीतांचा सराव करावा.**

- अंक देऊन टाळी वाजवून तालाचा सराव घ्यावा.
- तालामध्ये स्वर अलंकारांचा सराव घ्यावा.
- तालाची टाळी वाजवून केहरवा तालातील गीतांचा सराव करून घ्यावा.
- खेळ कसा खेळायचा हे विद्यार्थ्यांना समजून सांगावे.

CG –1/3
C – 1.1/3.2
LO–04AE41
/43




### केहरवा तालाचे वर्तुळ

- मैदानावर किंवा वर्गात खडूने एक मोठे वर्तुळ काढा.
- त्या वर्तुळाचे चित्रात दाखवल्याप्रमाणे ८ समान भाग करा आणि त्यांना अनुक्रमे १ ते ८ असे क्रमांक द्या.
- १ क्रमांकाच्या भागावर मोठ्या अक्षरात 'धा' (सम – X) लिहा.
- ५ क्रमांकाच्या भागावर मोठ्या अक्षरात 'न' (काल – O) लिहा.

- गट तयार करा. यासाठी वर्गातील ८ विद्यार्थी या वर्तुळाच्या ८ भागांवर उभे रहा. (जसे चित्रात मुले उभी आहेत). वर्गातील उर्वरित विद्यार्थ्यांनी वर्तुळाच्या बाहेर राहून निरीक्षण करा.
- कृती आणि हालचाल: प्रत्येक अंकाला (मात्रेला) वर्तुळातील विद्यार्थ्यांनी खालीलप्रमाणे कृती करा.
- १ मात्रा (सम – धा): १ क्रमांकावर उभा असलेला विद्यार्थी हवेत दोन्ही हात वर करून जोरात "धा" म्हणत उडी मारावी. (बाकीचे सर्व विद्यार्थीही जोरात टाळी वाजवतील).
- २, ३, ४ मात्रा (गे, न, ती): अनुक्रमे २, ३ आणि ४ क्रमांकावर उभी असलेले विद्यार्थ्यांनी आपापल्या जागेवर फक्त एक हलकी टाळी वाजवून आपापले बोल म्हणा.
- ५ मात्रा (काल – न): ५ क्रमांकावर उभा असलेला विद्यार्थ्याने "न" म्हणताना टाळी न वाजवता, दोन्ही हात बाजूला पसरवून 'काल' (रिकामी जागा) दाखवा.
- ६, ७, ८ मात्रा (क, धी, न): अनुक्रमे ६, ७ आणि ८ क्रमांकावर उभी असलेली विद्यार्थ्यांनी आपापल्या जागेवर हलकी टाळी वाजवून बोल पूर्ण करावा.

### खेळाचा दुसरा टप्पा (फिरते वर्तुळ):

तुम्हांला जेव्हा आपापल्या जागेवरचे बोल पाठ होतील, तेव्हा संगीत किंवा टाळ्यांच्या तालावर घड्याळाच्या काट्याच्या दिशेने (Clockwise) वर्तुळाभोवती फिरा.

- शिक्षकांनी '१' किंवा 'धा' म्हटल्यावर जो विद्यार्थी १ नंबरच्या भागावर (सम वर) येईल, त्याने झटकन उडी मारून जोरात टाळी वाजवायची.
- शिक्षकांनी '५' किंवा 'काल' म्हटल्यावर जो विद्यार्थी ५ नंबरवर असेल, त्याने टाळी न वाजवता हात पसरवून 'काल' दाखवायचा. याप्रमाणे खेळ खेळावा.
- वर्गातील सर्व विद्यार्थ्यांनी गटागटाने हा तालाचा खेळ खेळावा.

## ताल दादरा

मात्रा : ६ विभाग : २ ( ३ ३ मात्रांचे)

सम : १ मात्रेवर काल : ४ मात्रेवर

| मात्र | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|---|
| ठेका | धा | धी | ना | धा | ती | ना |
| चिन्ह | x | | | o | | |
| | सम | | | काल | | |



| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| **धा** | **धी** | **ना** | **धा** | **ती** | **ना** |
| x | | | o | | |
| **सम** | | | **काल** | | |

**पाठ्यपुस्तकातील 'या भारतात बंधुभाव नित्य वसु दे...' हे गीत दादरा तालात आहे. तालाची टाळी धरून गीताचा सराव करावा.**

## दादरा तालाची आगगाडी

दादरा तालात ६ मात्रा आणि ३-३ मात्रांचे २ विभाग असतात. १ वर 'सम' (टाळी) आणि ४ वर 'काल' (खाली) असतो.

- वर्गातील ६ विद्यार्थ्यांना चित्रात दाखवल्याप्रमाणे एका सरळ ओळीत एकमेकांच्या शेजारी उभे करा.
- त्यांना अनुक्रमे १ ते ६ क्रमांक द्या.
- प्रत्येक विद्यार्थ्याला त्याचा एक विशिष्ट 'बोल' (ठेका) ठरवून द्या:

- १ नंबर = धा (सम)
- २ नंबर = धी
- ३ number = ना
- ४ नंबर = धा (काल)
- ५ नंबर = ती
- ६ नंबर = ना
- टप्पा १: संथ गतीने सराव : शिक्षकांनी किंवा वर्गातील इतर मुलांनी संथ गतीने १ ते ६ आकडे मोजायचे. ज्या विद्यार्थ्याचा जो नंबर येईल, त्याने त्याचे बोल म्हणत खालील कृती करायची:
- १ नंबर (धा - सम): या विद्यार्थ्याने जोरात "धा!" म्हणत दोन्ही हातांनी मोठी टाळी वाजवायची आणि जागेवर छोटी उडी मारावी.
- २ आणि ३ नंबर (धी, ना): यांनी आपापले बोल म्हणत फक्त हळूच चुटकी वाजवायची किंवा पायाने जमिनीवर हलकी टॅप करा.
- ४ नंबर (धा - काल): हा या तालाचा 'काल' (बदल) आहे. त्यामुळे ४ नंबरच्या मुलाने "धा!" म्हणताना टाळी वाजवायची नाही, तर आपले दोन्ही हात हवेत बाजूला पसरवून मान हलवायची (टाळी नाही हे दाखवण्यासाठी).
- ५ आणि ६ नंबर (ती, ना): यांनी २ आणि ३ नंबरसारखेच हळूच चुटकी वाजवून बोल पूर्ण करावा.
- टप्पा २: वेग वाढवणे: एकदा क्रमाने बोल जमू लागले की शिक्षकांनी टाळीचा वेग वाढवावा. १ ते ६ ची आवर्तने सलग चालू ठेवावी. यामुळे मुलांमध्ये एक छान संगीत तयार होईल: "धा(टाळी) - धी - ना | धा(हात पसरवणे) - ती - ना".

# माझी कृती

**१) रिकाम्या जागी योग्य चिन्ह लिहा.**

अ] सम ............... या चिन्हाने दाखवतात.

ब] काल ............... या चिन्हाने दाखवतात.

**२) खालील आकृतिबंध पूर्ण करा.**

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ] | धा | गे | | | \| | न | क | | |
| ब] | धा | धी | ना | \| | | | | | |

**३) खाली दिलेल्या तालांच्या माहितीचा तक्ता पूर्ण करा.**

| ताल | मात्रा | विभाग/खंड | सम | काल |
|---|---|---|---|---|
| केहरवा | | | | |
| दादरा | | | | |

- खेळ कसा खेळायचा हे विद्यार्थ्यांना समजून सांगावे.
- तालांची टाळी धरून गीतांचा सराव करावा.
- प्रथम पृष्ठावरील क्यूआर कोड स्कॅन करून तालासुरात सराव करून घ्यावा.

CG –1/2
C – 1.1/2.1
LO–04AE41 / 43

# नृत्य







# १४. नाचू आनंदे

मुलांनो, आपले शरीर लवचिक आहेच पण शरीरामध्ये वेगवेगळ्या खेळाच्या, नृत्याच्या हालचाली करण्याची क्षमता असते. उदा. उड्या मारणे, वाकणे, वळणे इत्यादी. याच हालचालींना जेव्हा आपण लय तालाची जोड देतो तेव्हा त्यांचे नृत्यात रूपांतर होते.

**नृत्यामुळे**

- आनंद मिळतो.
- भावना व्यक्त होतात.
- उत्साह वाढतो.
- शरीर तंदुरुस्त राहते
- कौशल्यविकास होतो.
- आत्मविश्वास वाढतो.

## नृत्य

संपूर्ण शरीराचा वापर करून संगीत व तालाच्या आधारे केली जाणारी भावनांची अभिव्यक्ती म्हणजे नृत्य होय.

मुलांनो, आनंद व्यक्त करण्यासाठी नृत्य केले जाते.

नृत्याचे अनेक फायदे आहेत.

तुम्हाला नृत्य करायला का आवडते ते लिहा.

-------------------

-------------------

-------------------

-------------------

-------------------

-------------------

- नृत्याची परिभाषा व त्याचे फायदे वर्गात समजून सांगावे.
- मानवी जीवनात नृत्याचे महत्व यावर वर्गात चर्चा करावी. व १-२ वाक्य लिहिण्यास प्रेरित करावे.

CG – 1
C – 1.1
LO – 04AE54

## एकल नृत्य

### चला करून पाहू या !

आपल्या सगळ्यांना खेळ खेळायला आवडतात ना? या खेळांमध्ये नृत्य हालचाली कशा दडल्या आहेत ते पाहू या !

खाली दिलेल्या हालचालींचे निरीक्षण करा व प्रत्यक्ष करून बघा !




(लंगडी खेळातून तयार झालेली नृत्याची हालचाल डाव्या व उजव्या बाजूला उडी मारून करून पहावी.)



(पोहण्याच्या कृतीतून तयार झालेली नृत्याची हालचाल डाव्या व उजव्या बाजूला करून पहावी.)

मुलांनो, मजा आली ना ? चला तर, आता असेच काही खेळ शोधा व त्यांचे नृत्य हालचालींमध्ये कसे रूपांतर करता येईल याची कल्पना करू या व त्याची कृती पाहू या.

- कृतीत दिलेल्या चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे व त्या प्रत्यक्ष करण्यास प्रेरित करावे.
- वर्गात विविध कृती व हालचालींविषयी चर्चा करण्यास व त्या प्रत्यक्ष करून बघण्यास प्रोत्साहित करावे.

CG – 1
C – 1.1
LO – 04AE54

## पाहू या – शिकू या – नाचू या !

आतापर्यंत आपण नृत्यातील काही हालचाली एकट्याने करायला शिकलो आहोत पण आपण सर्व मित्रमैत्रिणी मिळून नाचलो तर अजून जास्त मजा येणार, नाही का?

समूहात नाचताना आपण एकमेकांसोबत ताल धरतो, एकसारख्या हालचाली करतो आणि आनंदाने नृत्य सादर करतो.तेव्हा त्यातून एक वेगळीच ऊर्जा मिळते. आता आपण याच विषयाबद्दल अधिक जाणून घेणार आहोत.

जेव्हा दोन किंवा दोनपेक्षा अधिक व्यक्ती एकत्र येऊन एकाच तालात आणि लयीत नृत्य सादर करतात तेव्हा त्याला 'समूह नृत्य' (Group Dance) असे म्हणतात.

समूह नृत्याचे काय काय फायदे आहेत ते पाहू या.




समूह नृत्यामध्ये लोकनृत्यांचा समावेश होतो. सण-उत्सव आनंद साजरा करण्यासाठी सर्व जण एकत्रित येऊन नृत्य करतात. यामधूनच लोकनृत्य आकाराला येते.

परिचित नृत्याचा प्रथम पृष्ठावरील क्यू. आर. कोडमध्ये दिलेला व्हिडिओ पाहा. व्हिडिओतील नृत्याचे निरीक्षण करा, त्यातील हालचालींचे अनुकरण, सराव व सादरीकरण करा.

- परिचित नृत्याचा व्हिडिओ दाखवणे व त्याचे अनुकरण, सराव तसेच सादरीकरण करायला प्रोत्साहन द्यावे.

CG – 1
C – 1.1, 1.2
LO–04AE54/55

## सारे मिळून नाचू या !

**दिलेल्या समूह नृत्य चित्रांचे निरीक्षण करून ते नृत्य प्रत्यक्ष करून बघा.**

### १. धनगर नृत्य

धनगर नृत्य हे महाराष्ट्रातील धनगर समाजाचे पारंपारिक लोकनृत्य आहे. हे नृत्य मुख्यत: सण, यात्रा आणि उत्सवाच्या प्रसंगी सादर केले जाते. ढोल, हलकी आणि पिपाणी यांच्या तालावर उत्साहाने नृत्य केले जाते.



धनगर नृत्य हालचाल १



धनगर नृत्य हालचाल २

### २. लेझीम

लेझीम हे महाराष्ट्रातील पारंपरिक लोकनृत्य आहे. हातात लेझीम घेऊन तालबद्ध हालचाली, उड्या आणि संगीताच्या ठेक्यावर हे नृत्य केले जाते.



लेझीम हालचाल १



लेझीम हालचाल २

- लेझीम व धनगर नृत्याचे प्रात्यक्षिक मुलांकडून करून घ्यावे.

CG – 1
C – 1.1, 1.2
LO–04AE54
/55

### ३. लावणी

लावणी हे महाराष्ट्रातील अतिशय लोकप्रिय लोकनृत्य आहे. हे नृत्य मुख्यत: ढोलकीच्या तालावर सादर केले जाते. लावणीत अभिनय, मुख अभिनय आणि भावपूर्ण हालचालींना महत्त्व आहे.



लावणी हालचाल १



लावणी हालचाल २

### ४. वारली नृत्य

वारली नृत्य हे वारली आदिवासी समाजाचे पारंपरिक लोकनृत्य आहे. हे नृत्य सण, विवाह आणि आनंदाच्या प्रसंगी केले जाते. निसर्ग, एकता आणि सामूहिक जीवन यांचे दर्शन या नृत्यातून घडते. साधेपणा आणि उत्साह हे वारली नृत्याचे वैशिष्ट्य आहे.



वारली हालचाल १



वारली हालचाल २

वरील नृत्यांचे प्रथम पृष्ठावरील क्यू. आर. कोडमध्ये दिलेले व्हिडिओ पाहा. व्हिडीओत दिलेल्या नृत्याचे निरीक्षण करा व त्यातील हालचालींचे अनुकरण, सराव व सादरीकरण करा!

## माझी कृती

वर्गात विविध गट करून प्रत्येक गटाने लोकनृत्याचा सराव करून ते वर्गात सादर करावे.

- चित्रांच्या आधारे नृत्य हालचाली करण्यास साहाय्य करावे.
- परिचित नृत्यांचा व्हिडिओ दाखवावे व त्याचे अनुकरण सराव तसेच सादरीकरण करायला प्रोत्साहन द्यावे.

CG – 1
C – 1.1, 1.2
LO–04AE54/55

# १५. नृत्यमय जीवन

## हालचालींमधून नृत्य

आपण रोजच्या जीवनात अनेक हालचाली करत असतो. उदा. चालणे, धावणे. वाकणे, उड्या मारणे, हात हलवणे. या दैनंदिन हालचाली नृत्यामध्येही वापरल्या जातात, पण त्या लय, ताल आणि भावना यांच्यासोबत केल्या जातात. तेव्हा या दैनंदिन हालचाली नृत्याच्या हालचालींसारख्या दिसतात. चला, अशाच काही हालचाली करून पाहू या आणि त्यातून नृत्याची मजा अनुभवू या.

## नृत्य आपल्या आजूबाजूला !

**खाली दिलेल्या हालचालींचे निरीक्षण करा व प्रत्यक्ष करून बघा !**









## चला करून पाहू या!

दैनंदिन जीवनातील अशा इतर हालचालींची वर्गात चर्चा करा व गीताच्या आधारे त्या कृती वर्गात करून बघा.

- कृतीत दिलेल्या चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे व त्या प्रत्यक्ष करण्यास प्रोत्साहन द्यावे.
- वर्गात विविध कृती व हालचालींविषयी चर्चा करण्यास व त्या प्रत्यक्ष करून बघण्यास प्रोत्साहित करावे.

CG – 4
C – 4.1
04AE56/59/61

- **हस्तांची बोली**

दैनंदिन जीवनात आपण आपल्या हातांच्या पंज्यांचा व बोटांचा विविध पद्धतीने वापर करतो. या हालचालींमध्ये नृत्य दडलेले असते.अशा नृत्यात्मक हालचालींची ओळख करून घेऊ या.

**चला हस्तमुद्रांची भाषा बोलू या!**

चौकटीत दिलेल्या हस्तमुद्रेचा दैनंदिन जीवनात आपण कसा वापर करतो यावर याची वर्गात चर्चा करावी. त्या हालचालीचे प्रत्यक्ष सादरीकरण करून बघा आणि त्याची एक यादी दिलेल्या जागेत लिहा.

### १. अलपद्म हस्तमुद्रा





### २. सूची हस्तमुद्रा





### ३. शिखर  हस्तमुद्रा





- चौकटीत दिलेल्या हस्तमुद्रांचा दैनंदिन जीवनात कसा वापर होतो याची वर्गात चर्चा करण्यास व प्रत्यक्ष करून बघण्यास प्रेरित करावे.

CG – 4
C – 4.1
04AE56/59/61

## चला जोड्या जुळवा!

आता आपण काही हस्तमुद्रा पाहिल्या. पुढे काही चित्रे दिली आहेत, त्यांचा वापर कशासाठी होऊ शकतो याची कल्पना करा. आता उलट कृती करून पाहू या– दिलेल्या हस्तमुद्रांवरून तुम्हांला दिलेल्या चित्रांपैकी ते कोणत्या चित्रास अनुसरून आहे, याची रेषा ओढून जोडया जुळवा.

१. 



२. 



३. 



४. 



५. 



- योग्य जोड्या जुळवण्यास सहकार्य करावे.

CG – 4
C – 4.1
04AE59/61

## निसर्गातील नृत्यात्मक हालचाली

निसर्गात अनेक सुंदर हालचाली दिसतात. झाडांची पाने-फुले वाऱ्यावर डोलतात, पावसाच्या सरी पडतात, नदी वाहते. या हालचालींमध्ये लय, गती आणि सौंदर्य असते. नृत्यातील हालचाली देखील अशाच लयबद्ध आणि सुंदर असतात. त्यामुळे निसर्गातील हालचालींमधून नृत्याची प्रेरणा मिळते.

## निसर्गात शोधू नृत्य !

खाली दिलेल्या चित्रांमधील हालचाली ओळखून त्याला नृत्यमय पद्धतीने करून बघा.

१.





२.





३.





- खाली दिलेल्या चित्रांमधील हालचाल ओळखून त्याला नृत्यमय पद्धतीने करून बघण्यास प्रेरित करावे.

CG – 4
C – 4.1
LO– 04AE59, 04AE61

४.





५.





**चर्चा करू या!**

निसर्गात पाहिलेल्या इतर कृती व त्या कृतींच्या नृत्यात्मक हालचाली यांविषयी चर्चा करा. त्यांचे वर्णन करा व तुलना करा.

**करून पाहूया!**

आतापर्यंत शिकलेल्या विविध हालचालींचा वापर करून पाठ्यपुस्तकातील तुमच्या आवडीच्या कविता किंवा गाण्यावर नृत्य हालचाली करा.

## माझी कृती

१. निसर्गातील विविध घटकांचे (नदी, फुले, पक्षी, झाडे, इंद्रधनुष्य) सुंदर चित्र काढा. या प्रत्येक घटकांच्या हालचाली आपल्या शारीरिक हालचालीतून दाखवण्याचा प्रयत्न करा. वर्गात आपल्या हालचाली सादर करा व मित्रमैत्रिणींच्या सादरीकरणाचे निरीक्षण करा.

२. पाठ्यपुस्तकातील आवडीच्या निसर्गगीतावर नृत्य सादर करा.

- निसर्गात पाहिलेल्या कृती व त्या कृतींच्या नृत्यात्मक हालचाली यांविषयी चर्चा, वर्णन, तुलना, प्रत्यक्ष हालचाली करून पाहण्यास सांगावे.
- निसर्गावर आधारित गीताची निवड करण्यास व त्यावर नृत्य सादर करण्यास प्रोत्साहन द्यावे.

CG – 4
C – 4.1
04AE59/61

# १६. नृत्याचे सोबती

नृत्य करण्यासाठी काही महत्वाच्या गोष्टीची साथ असणे अत्यंत आवश्यक असते. त्याशिवाय नृत्याचा आनंद घेता येत नाही.

चला तर मग, नृत्याचे कोणकोणते सोबती आहेत ते समजून घेऊ.

## अ. ताल

गाणे गाताना आणि नृत्य करताना जो नियमित ठेका ऐकू येतो व तो हालचालींना गती आणि दिशा देतो, त्याला 'ताल' असे म्हणतात.

तालामुळे नृत्य लयबद्ध आणि सुंदर होतेच, शिवाय ते एका विशिष्ट गतीने सादर करता येते.

### दादरा तालाचा खेळ खेळूया!

तळ्यात मळ्यात खेळ खेळता ना? त्याच खेळात तालाची गंमत करून पाहू .

तळ्यात उडी मारताना टाळी वाजवा आणि 'धा धिं ना' म्हणा. मळ्यात उडी मारताना कमरेवर हात ठेवा आणि 'धा तू ना' म्हणा. याच प्रमाणे तालाचे बोल म्हणत तुमच्या आवडीच्या नृत्य हालचाली करा.

| तळ्यात उडी मारताना टाळी वाजवणे. | मळ्यात उडी मारताना कमरेवर हात ठेवणे. |
|---|---|
| धा धी ना<br>१ २ ३ | धा ती ना<br>४ ५ ६ |

### तालातील फरक ओळखा!

तालाच्या ठेक्यानुसार नृत्यातील हालचाली बदलतात. ते कसे, हे जाणून घेण्यासाठी आधीच्या वर्षी शिकलेला केहरवा ताल आणि या वर्षी शिकलेला दादरा ताल या दोन्ही तालांवर आणि त्यातील फरकांवर चर्चा करा. यासाठी केहरवा व दादरा तालाचा प्रथम पृष्ठावरील व्हिडीओ क्यू. आर कोडच्या मदतीने पहा आणि त्यातील फरक समजून घ्या.

- वर्गात केहरवा आणि दादरा या तालांविषयी चर्चा करण्यास सांगावे व व्हिडिओच्या आधारे तालामुळे हालचालींत झालेला फरक विद्यार्थ्यांना स्पष्ट करावा.
- वरील खेळ व तालातील फरक क्यूआर कोडच्या सहाय्याने दाखवा.

CG – 2
C – 2.2
04AE57

## ब. वाद्य

**चला बरं, नृत्यातील वाद्यांचा वापर थोडक्यात समजून घेऊ या.**

वेगवेगळ्या नृत्यप्रकारांनुसार वेगवेगळी वाद्ये वापरली जातात.

**काही हालचाली गोल आणि प्रवाही असतात.** या हालचाली सुरेल संगीतावर केल्या जातात. अशा वेळी बासरी किंवा व्हायोलिन यांसारखी वाद्ये वापरली जातात.

बासरी





व्हायोलिन



बासरी किंवा व्हायोलिन यांचा वापर करून तयार झालेल्या संगीताचा ऑडिओ ऐकून डोळे बंद करून संगीतानुसार मुक्त हालचाली करून पहा.

**काही हालचाली ताल आणि ठेक्यावर केल्या जातात.**

अशा वेळी तबला किंवा मृदंग यांसारखी ताल वाद्ये वाजतात. या हालचालींमध्ये पायांचे ठेके आणि पायाच्या हालचालींतून ठरावीक लय दिसते.

मृदंग





तबला



- प्रवाही व ठेक्यावर केल्या जाणाऱ्या हालचाली वर्गात करून पाहण्याची संधी द्यावी.
- प्रवाही हालचाल करण्यासाठी बासरी किंवा व्हॉयोलिनचे संगीत ऑडिओ ऐकून डोळे बंद करून मुक्त हालचाली करण्याची संधी द्यावी.

CG – 3
C – 3.1
LO–04AE58/59/60

## तुम्हांला माहीत आहे का?

### वाद्यांचे प्रकार

वाद्ये मुख्यत: ४ प्रकारची असतात –

- **तंतूवाद्ये** – तारांमधून आवाज येतो. उदा. वीणा, सतार, तंबोरा, सारंगी
- **तालवाद्ये** – थाप देऊन वाजवली जातात. उदा. तबला, ढोल, मृदंग, नगारा
- **वायूवाद्ये** – फुंकून वाजवली जातात. उदा. बासरी, शहनाई, शंख, पेटी.
- **घनवाद्ये** – २ धातूंचा एकमेकांवर घात करून वाजवली जातात. उदा. टाळ, झांज, घंटा, चिपळी इत्यादी.

ही वाद्ये संगीताला लय आणि माधुर्य देतात.

## नृत्यासाठी गीत व वाद्यांची निवड

**नृत्य आविष्कार करू या!**

तुम्हांला तुमच्या आवडीच्या कवितेवर नृत्यरचना तयार करायची आहे. यासाठी तुमच्या पाठ्यपुस्तकातील कवितांमधून एखाद्या गीताची निवड करा. या गीतावर नृत्य करण्यासाठी तुम्ही कोणकोणती वाद्ये वापरू शकता याची वर्गात चर्चा करा. तसेच या गाण्यावर तुम्ही कोणकोणत्या नृत्य हालचाली करू शकता याचा विचार करा व त्यांचा सराव करा.

- नृत्य रचना करण्यासाठी पाठ्यपुस्तकातील कवितांमधून गीताची निवड करण्यास सांगावे. त्या गीतावर नृत्य सादर करण्यासाठी वाद्यांची निवड करण्यासाठी व नृत्यात्मक हालचालींच्या रचनेसाठी मार्गदर्शन करावे.

CG – 3
C – 3.1
LO–04AE58
/59

# माझी कृती

**• नावांची गंमत!**

वाद्यांची नावे शोधून गोल करावे.

(तुतारी, टाळ, बासरी, झांज, तबला, डफ, मृदंग, वीणा, ढोलकी, ताशा)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| बा | स | री | ता | शा | त |
| तु | मा | री | वी | णा | ब |
| ढो | ता | मृ | प | झां | ला |
| र | ल | री | दं | ज | टा |
| ड | फ | ळी | स | ग | ळ |

**• चला करून पाहू**

एखादे सोपे वाद्य तयार करा किंवा घरून आणा (उदा. मातीचे भांडे, वाळू भरलेली बांबूची काठी, स्टीलचा ग्लास व चमचा, डमरू, ढोलक इत्यादी).

नंतर 'दादरा' हा ताल (धा, धि, ना, धा, तू, ना) निवडावा. प्रत्येक विद्यार्थ्याने एका अक्षरासाठी एक वाद्य निवडून वाजवावे.

प्रथम एकामागोमाग एक वाजवून पाहावे, नंतर सर्वांनी मिळून ताल वाजवण्याचा प्रयत्न करावा.

- विद्यार्थ्यांचे समान गट तयार करावे आणि सोपे वाद्य तयार करण्यासाठी मार्गदर्शन करावे. यामधून संगीत समन्वय साधण्यासाठी प्रोत्साहन द्यावे.

CG - 3
C - 3.1
LO-04AE58/59

# १७. पारंपरिक नृत्य

## नृत्य व नृत्याचे गीत

गीतामध्ये व कवितेमध्ये शब्दांबरोबर भावना, कल्पना आणि सुंदर चित्रे दडलेली असतात. या भावना आणि विचार आपण नृत्याच्या हालचालींमधून व्यक्त करू शकतो.

## समजून घेऊ नृत्याची प्रक्रिया !

१.आपल्याला आवडणारी एखादी कविता निवडा आणि ती नीट वाचा.

२.कवितेचा अर्थ, त्यातील भावना आणि प्रसंग समजून घ्या.

३.प्रत्येक शब्दासाठी हालचाल करणे आवश्यक नाही; कवितेतील विचार प्रतिकात्मक हालचालींमधून दाखवा.

४.हातवारे, चेहऱ्यावरील भाव आणि शरीराच्या हालचालींचा वापर करा.

५.कवितेची लय आणि भावना लक्षात ठेवून नृत्य सादर करा!



वाचा



विचार करा



नृत्य करा

- नृत्याची प्रक्रिया सोदाहरण स्पष्ट करावी.
- दिलेल्या सूचना पाळण्यास मार्गदर्शन करावे.

CG – 3
C – 3.2
LO–04AE60

## चला, कवितेवर नृत्य करून पाहू.

तुमच्या आवडीच्या गीतावर नृत्य रचना करण्यासाठी एकमेकांशी चर्चा करून नृत्यात्मक हालचालींची निवड करा निवडलेल्या हालचालींचा सराव करा व प्रत्यक्ष नृत्य सादर करा.

स्वर्गात आकाशगंगा,
गंगेला सोनेरी घाट
घाटाला पायऱ्या शंभर,
झाला आनंद आली बहार ॥ ध्रु ॥

घाटाशी लावीला एक,
एक स्वर्गीय कल्पतरू
तरूला फांद्या शंभर,
झाला आनंद आली बहार ॥१॥

तरूच्या फांदीवर,
फुले फुलती नक्षत्रांची
फुलाला पाकळ्या शंभर,
झाला आनंद आली बहार ॥२॥

सुटलं वारं जोरात,
फुले विखुरली पाण्यात
तरंग उठले शंभर,
झाला आनंद आली बहार ॥३॥

गंगेला आला पूर ,
अहो पुराचं पाणी चढलं
बुडाल्या पायऱ्या शंभर,
झाला आनंद आली बहार ॥४॥



– रत्नाकर मतकरी

- विविध पद्यांवर नृत्य सादर करण्यासाठी हालचालींची कल्पना करून नृत्य रचना करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रेरित करावे.

CG – 3
C – 3.2
Lo–04AE60

## नृत्य व संस्कृती

महाराष्ट्रात अनेक पारंपरिक नृत्य प्रकार आढळतात. या नृत्यांमध्ये त्या प्रदेशातील जीवनपद्धती, पोशाख आणि संगीत यांचे सुंदर प्रतिबिंब दिसते. उदा लावणी, कोळी नृत्य, तारपा नृत्य, लेझीम, वाघ्या मुरळी, पावरा नृत्य, वारकरी नृत्य इ.



तारपा नृत्य



लेझीम नृत्य

### चला नृत्यावर चर्चा करू या!

आपल्या परिसरात सादर होणारा एखादा नृत्य किंवा लोकनृत्य प्रकार शोधा. त्यावर वर्गामध्ये चर्चा करा. याच बरोबर आपल्या मित्रमैत्रिणींसोबत नृत्याच्या ४-५ सोप्या हालचाली करून पहा.

### चित्र काढू या नृत्याचे!

एखाद्या वारली चित्राचा संदर्भ घेऊन, कल्पनेनुसार 'वारली नृत्याचे' चित्र रेखाटन करावे.

- वारली चित्रांमध्ये दाखवल्याप्रमाणे विद्यार्थ्यांना नृत्याच्या हालचाली करायला सांगावे. उदा. एकमेकांत हात गुंफून फेर धरणे आणि गोलाकार फिरत नृत्य करणे.

CG - 4
C - 4.2
LO-04AE62

## शिकूया – नाचूया !

उपलब्ध सांस्कृतिक किंवा पारंपरिक नृत्याचे निरीक्षण करा, त्यातील हालचालींचे अनुकरण, सराव व सादरीकरण करा!

### माझी कृती

**चित्र पाहून प्रश्नांची उत्तरे शोधू या.**



१) चित्रात कोणता नृत्य प्रकार दिसत आहे?

२) नृत्य करताना कोणकोणत्या वाद्यांचा उपयोग केलेला आहे?

३) कशा पद्धतीने उभे राहून नृत्य केले जात आहे?

४) वेशभूषा काय आहे?

- परिचित सांस्कृतिक/ पारंपरिक नृत्याचा (उदा – वारकरी नृत्य ) व्हिडिओ दाखवणे व त्याचे अनुकरण, सराव तसेच सादरीकरण करायला प्रोत्साहन द्यावे. असे सांस्कृतिक कलाविष्कार पाहण्यास तसेच संस्कृतीचे महत्व जाणून घेण्यास मुलांना प्रेरित करावे.

CG – 4
C – 4.2
LO–04AE62

# १८ . कलासंस्कृती

आपली संस्कृती व परंपरा याला विज्ञानाची जोड दिलेली असून त्यामधून आनंददायी जीवन जगण्याची प्रेरणा मिळते. काही ऋतूनुसार येणारे सण, उत्सवातून तसेच परंपरेतून त्या प्रत्येक ऋतूला आपल्या आरोग्याला योग्य असे खाद्यपदार्थ, वस्त्रे आणि विविध कलांचा आविष्कार आपल्याला पहावयास मिळतो. ही संस्कृती जपल्याने सारी माणसे एकत्र येतात. आपले हितसंबंध जोडेले जाऊन एकत्र आनंद घेतात. विविध कलांचा आणि कलाकारांचा सन्मान वाढतो.

सण-उत्सवाच्या निमित्ताने नृत्य, नाट्य, सजावट, शिल्प, चित्र, गायन, वादन त्याचबरोबर

## आपला सण आपले उत्सव

आपल्या परिसरातील सण व उत्सव यांची यादी तयार करा. त्यापैकी कोणत्याही एका सण-उत्सवाबद्दल अधिक माहिती चित्रे, छायाचित्रे आणि कात्रणांसह संकलित करून सजावट करा.

**ओळखा व प्रसंग लिहा :**

खालील चित्रांतील प्रसंग ओळखून त्या सण उत्सवांविषयी माहिती लिहा.











तुमच्या परिसरात साजरा होणाऱ्या सण समसरंभाचे निरीक्षण करून त्यातील कलाप्रसंगाचे गटात सादरीकरण करा.

- आपल्या राज्यातील विविध लोककला, सण-उत्सव, पारंपरिक खेळ, खाद्यसंस्कृती या सर्वांतील कलात्मक वैशिष्ट्ये विविध उदाहरणांच्या माध्यमातून समजावून द्यावीत.

CG -4
C- 4.1/4.2
LO-
04AE20/21/39/
38

नित्य वापरातल्या विविध वस्तू या साऱ्यांचा सहभाग असतो. त्यात प्रत्येक विषयांचे कलाकारही सहभागी असतात. त्यानिमित्ताने कलाकारांची ओळख होते.



मातकाम



वारली चित्रकला



नर्तकी



भारूड कलाकार



वासुदेव



रंगभूषाकार



गायिका

- तुमच्या परिसरात साजऱ्या होणाऱ्या सण समारंभाचे निरीक्षण करून त्यातील कला व प्रसंगाचे गटात सादरीकरण करा.

CG -4
C-4.2
LO-
04AE39/52

## क्षेत्रभेट :

स्थानिक कला संस्कृती समजून घेण्यासाठी क्षेत्रभेट खूप महत्वाची आहे. क्षेत्रभेट म्हणजे प्रत्यक्ष एखाद्या ठिकाणी जाऊन तेथील कला, कलाकार आणि परंपरा पाहणे. अशा भेटीत आपल्या परिसरातील कलाकारांचे काम जवळून पाहण्याची संधी मिळते.

उदाहरणार्थ, मातीची भांडी बनवणारे कारागीर, चित्रकला क्षेत्रात काम करणारे कलाकार किंवा हस्तकला तयार करणारे लोक, कसे काम करतात हे प्रत्यक्ष पाहता येते. कलाकार माती, रंग, कापड किंवा इतर साहित्य वापरून सुंदर वस्तू कशा तयार करतात हे समजते.

### क्षेत्रभेटी दरम्यान घ्यावयाची दक्षता

जेव्हा एखाद्या कलाकाराच्या कार्यशाळेला किंवा स्थानिक प्रदर्शनाला भेट देतो तेव्हा खालील गोष्टींचे पालन करावे.

- **निरीक्षण :** कलाकार आपले हात किंवा साधने कशी वापरतो याचे शांतपणे निरीक्षण करा.
- **प्रश्न विचारणे :** मनात आलेल्या शंका नम्रपणे विचारा.
- **नोंदवही :** पाहिलेल्या गोष्टींची आणि मिळालेल्या माहितीची वहीत नोंद करा.
- **स्वच्छता व शिस्त :** भेट देण्याच्या ठिकाणी कोणत्याही वस्तूला परवानगीशिवाय हात लावू नका आणि तिथे कचरा करू नका.
- **कृतज्ञता :** क्षेत्र भेट संपल्यावर कलाकाराचे आभार मानायला विसरू नका.

## मुलाखत :

परिसरातील सण उत्सवाच्या निमित्ताने सादर होणाऱ्या विविध कलाप्रकारांचे निरीक्षण करा.

वासुदेव, पिंगळा, नंदीबैलवाला, चित्रकार, मुर्तीकार, गायक, वादक, मातीकाम, लाकूडकाम करणारे, फुलांची सजावट करणारे तसेच नर्तक-नर्तिका आणि रंगकर्मी या व अशा कलाकारांपैकी काही कलाकारांची मुलाखत घेऊन त्यांच्या कलेविषयी जाणून घ्या. यासाठी वर्गात मुलाखतीचे प्रश्न तयार करा.

## माझी कृती

१) तुमचा आवडता सण किंवा उत्सवाचे चित्र काढा व त्यातील कलात्मक घटकांवर माहिती लिहा.

२) परिसरातील कलात्मक प्रेक्षणीय स्थळांना भेटी देऊन त्याबद्दलची माहिती लिहा.

३) तुमच्या परिसरातील एका कलाकाराची भेट घेऊन त्यांची कला व कार्य याविषयी मुलाखत घेऊन त्या नोंदी अहवाल स्वरूपात लिहा.

४) स्थानिक कलाकारांपैकी आवडीच्या कलाप्रकाराची चित्रे, फोटो, कात्रणे व माहिती जमा करून प्रकल्प करून घ्यावा.

- स्थानिक कला आणि परंपरा यांवर गटात चर्चा घडवून आणून मुलाखती व क्षेत्रभेट घेण्यास प्रोत्साहन द्यावे.

CG -4
C- 4.2
LO- 04AE21/38/39

## विशेष नोंदी

प्रिय विद्यार्थी मित्रांनो आणि मैत्रिणींनो,

जर तुम्हांला कोणी अयोग्य रीतीने स्पर्श केल्यामुळे तुम्ही अस्वस्थ झाला असाल, तर तुम्ही अजिबात गप्प बसू नका. अशी घटना घडल्यास, तुम्ही खालील गोष्टी करणे आवश्यक आहे.

१) स्वतःला दोष देऊ नका.

२) तुमचा ज्यांच्यावर विश्वास आहे, त्यांना घडलेल्या घटनेबद्दल सांगा.

३) तुम्ही पोक्सो ई-बॉक्सद्वारे तुमच्या हक्कांच्या संरक्षणासाठी स्थापन केलेल्या राष्ट्रीय आयोगाला देखील कळवू शकता.

**जेव्हा तुम्हांला कोणी अयोग्यरीत्या स्पर्श करतो, तेव्हा तुम्हांला वाईट वाटू शकते, तुम्ही गोंधळून जाऊ शकता, तुम्हांला असहाय्य वाटू शकते; पण तुम्हांला 'वाईट' वाटण्याचे काहीच कारण नाही, कारण यात तुमचा दोष नाही.**




**हे बटण दाबा.**

**POCSO हा e-box ncpcr@gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.**

**जर तुमचे वय १८ वर्षांपेक्षा कमी असेल. तुम्हांला कोणी त्रास दिला असेल आणि तुम्ही गोंधळलेले असाल, पीडित असाल, तणावात असाल अथवा अशा प्रकारचा त्रास सहन करणारे कोणी मूल तुमच्या माहितीत असेल, तर १०९८ (दहा नऊ आठ) ला संपर्क साधा. त्यामुळे आपले व मित्रांचे जीवन बदलू शकते.**

CHILD LINE 1098
NIGHT & DAY

**चाइल्ड लाइन १०९८ (दहा नऊ आठ) : ही एक २४ तास टोल फ्री राष्ट्रीय आपत्कालीन फोन सेवा आहे. महिला आणि बालविकास मंत्रालयातर्फे, पीडित मुलांसाठी राबवला जाणारा, चाइल्ड लाइन फाउंडेशनने सुरू केलेला हा उपक्रम आहे.**

नए समाज की ओर
Towards a new dawn

- **विद्यार्थ्यांना चांगला स्पर्श आणि वाईट स्पर्श ओळखण्यासाठी त्यांच्या वयोगटांनुसार शारीरिक आणि भावनिकदृष्ट्या मार्गदर्शन करावे.**

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे – ४११ ००४

कलाशिक्षण इयत्ता चौथी (मराठी माध्यम)

समग्र शिक्षा
Samagra Shiksha
(विनामूल्य वितरणासाठी)



कलाशिक्षण इयत्ता चौथी (मराठी माध्यम)